शनिवार । १४ सप्टेंबर १९७४
एक रुपया
माणूस

# ही हाडे किती दिवस पुरणार ?

## ‘ काय मावशी, काय करता ? ’

**सदर स्त्रीने वर पाहिलं अन् म्हणाली ‘ हाड काढतेय, इथच गेल्या वर्षी एका माणसाला माझ्या देखत पुरलय, त्यासाठी इथच उकरतेय. हाड सापडली तर बरबडा घेऊन तरी खाता येईल.’**

चोहोकडे महागाईने थैमान माजविले आहे. सामान्य माणसाला जीवन जगणे मुश्कील होऊन गेले आहे. दुष्काळातही अशी भीषण परिस्थिती जाणवली नव्हती असेच म्हणावे लागेल. त्यातल्यात्यात केज तालुक्यातील मजुरावर भयंकर हलाखीची वेळ आली आहे.

काही खेडयातील मजूर शहराकडे निघून गेले आहेत. इथे कसल्याही प्रकारची कामे उपलब्ध नाहीत. त्यामुळे मजुरांवर भयंकर उपासमारीची वेळ आली आहे. तर लहान शेतकरी हवालदील झाला आहे. जवळ जवळ अर्धा केज तालुका डोंगराळ आहे. महाराष्ट्र सरकारने पाच एकरांपेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य पुरवणे बंद केले आहे. त्यामुळे या भागातील लहान शेतकरीही उपासमारीचे जीवन जगतो आहे.

केजचे तहसीलदार श्री. दी. सू. पाटील यांच्या सोबत ‘ लव्हरी ’ या गावाला जाण्याचा योग आला. एका पाझर तलावाचे अर्धवट राहिलेले काम चालू होणार होते. पन्नास साठ मजुरांना काम मिळणार होते. जागेवर जाऊन गावात परत येण्यास रात्रीचे सात वाजले. ग्रामपंचायतीसमोर गाडी भोवती जवळ जवळ दोनशे माणसे जमा झाली. अंगावर नाममात्र कपडे असलेला एक मनुष्य समोर आला. ‘ सायब, आमाला दुकानात धान्य मिळत नाई ’ त्याने तक्रार केली. साहेबांनी चौकशी केली. तलाठी जवळच होता. त्याने सांगितल की सदर इसमाची पाच एकरापेक्षा जास्त जमीन आहे. साहेब म्हणाले ‘ तुम्हाला देता येणार नाही, तुम्ही शेतकरी आहात. ’ जमावातला दुसरा म्हणाला ‘ सायब, आमी काय पाप केलंय, खाण्यासाठी घरावरले पत्रे विकले, उघडयावर न्हाताव. घरात व्हती नवती ती भांडीबी इकली, अता झाकणीत (कुंभारानी वाटीसारखे बनवलेले मातीचे भांडे) खाताव ; तुम्ही तर धान्य देत नाय ; कस जगायच आमी ! ’ बोलताना त्याच्या डोळयात पाणी उभ राहिल होत.

हे फक्त ‘ लव्हरी ’ गावीच घडतय अस नाही. डोंगरातील जवळ जवळ ७०% शेतकऱ्यांची अशी स्थिती आहे. डोंगराची दहा पंधरा एकर जमीन सातबाराला नावाला असून उपयोग काय ? पिकाच उत्पन्न

पृष्ठ ४ वर


सां.वि.मि.रे.प्र.दु.नि.स. हे कोणत्या रागाचे बोल आहेत की काय?
छे हो! सांगली-विश्रामबाग-मिरज रेल्वे प्रवासी दुर्दशा निवारण समिती रागावलीय!


भारतात राहून बरेच अर्ज, बरेच वशिले लावले, पण मदत मिळत नाही. सिक्किमला राहून आता मदत मिळते का ते पाहतो!


डोळ्यांत तेल घालून पहारा करशील ?
खायला नाही तेल तर डोळ्यात कसे घालू ?


आता लवकर प्रसूत होण्याचं नावच काढू नका एक्स्प्रेस डिलीव्हरी बंद होणार आहे ना ?
प्रसूति गृह
श्यामजोशी-

# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १४ सप्टेंबर | अंक : सोळावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


मुखपृष्ठावरून....

काहीच नाही. सातबाराला पाच एकरपेक्षा जास्त जमीन म्हणून धान्य मिळत नाही. बरेच लोक अशा भीषण अन्नटंचाईला तोंड देत आहेत. खेड्यात जाऊच वाटत नाही.

असेच एके दिवशी माजी आमदार अॅड. भाऊराव शेप यांच्या शेतीवर जाण्याचा योग आला. त्यांनी खुरपणी चालू केली होती. आम्ही झाडाखाली बसलो. आम्हाला पिण्यासाठी एका मुलान पाणी आणल. सहज त्याची चौकशी केली; सुशिक्षित वाटला म्हणून शिक्षणही विचारल आणि त्या मुलान सांगितल, या वर्षी बी. ए. फायनलची परीक्षा दिल्याच. बी. ए.चा मुलगा तिथं खुरपणी करीत होता. मनाला पटत नव्हत; आणखी चौकशी केली तेव्हा म्हणाला, 'काय करावं, आम्हाला कसलीच कामं नाहीत. आज वकील साहेबान खुरपण्यास लावलंय, यरवी तेही काम मिळत नाही. आजचा एक रुपया रोजगार मिळतो आहे, याचंच समाधान होतंय. पोटासाठी काहीतरी करण जरूर आहेच की ! मी एकटाच नाही. दोन सेकंड इयरची अन् एक पी. यू. सी. असलेला अशी दुसरीही तीन मुल आहेत खुरपणीला आलेली.'

हे खोट नाही. कोणाचाही विश्वास बसणार नाही पण या तालुक्यातील सामान्य माणूस आपली माणुसकी 'पोटासाठी' विसरत चाललाय, हे सत्यच होय. पोटासाठी कधी, कोण, कुठ, काय करील याचा नेमच नाही.

मागे मजुरांनी लिंबोळ्या विकून आपला चरितार्थ चालविला; नंतर जनावराची हाडे विकून भागवल. ती तरी किती दिवस पुरणार ? अलीकडे खेडोपाडी स्मशानभूमी खोदण्याच काम चालू आहे. आता मानवी हाडावर या तालुक्यातील माणस जगत आहेत. त्याला ऐंशी पैसे किलोचा भाव आहे.

एके दिवशी आम्ही धारूरला जात होतो. याच गप्पा चालू होत्या. माणस माणसाची हाडे विकून चरितार्थ चालवतात' यावर माझातरी विश्वासच बसत नव्हता. धारूर जवळ आल. गावाच्या अलिकडेच एक स्मशानभूमी आहे. त्या ठिकाणी एक बाई व दोन मुल उकरीत असल्याचे दिसले. माझे मित्र साप्ताहिक 'पाठलाग'चे सहसंपादक म्हणाले आपण पाहू या. कडक्टरला विनंती करून आम्ही खाली उतरलो. एक पंचावन-साठ वर्षाची म्हातारी, एक आठ वर्षाचा व एक सहा वर्षाचा मुलगा अशी तिघही उकरीत होती. सहजच विचारल 'काय मावशी, काय करता ?' सदर स्त्रीने वर पाहिल अन् म्हणाली, 'हाडं काढतेय, इथच गेल्या वर्षी एका माणसाला माझ्या देखत पुरलय, त्यासाठी इथच उकरतेय; हाडं सापडली तर बरबडा घेऊन तरी खाता येईल !'

त्या लहान मुलांकडं पाहिल अन भावी पिढीची कीव आली. हेच का या देशाच भवितव्य उंचावणार ! काय संस्कार होत आहे या कोवळ्या मनावर ? आम्हाला लहानपणी स्मशानभूमी म्हटल की भीती वाटायची. या मुलांना काहीच वाटत नाही.

ही धारूरचीच परिस्थिती आहे अस नाही. खेडोपाडी शेकडो कुटुंबे सध्या आपला उदरनिर्वाह स्मशानभूमीवर चालवीत आहेत. ही हाडे किती दिवस पुरणार ? एकदा हाडे संपली की मग काय ? माणसाला माणसे विकता येतील काय ?

जनावरे जे गवत खात नाहीत अशा गवताच्या बियावर (बरबडा) या तालुक्यातील सामान्य मजूर जगतो आहे. त्यात जीवनसत्त्व नाही. त्याचा दर ६० पैसे किलोचा आहे. दुसर एवढ स्वस्त काहीही नाही.

–पी. एम्. जोगदंड, केज

तुम सुने क्या कभी मिरजमें हिंदू मुसलमानका झगडा हुवा बोलकर ?

# कासे कहूँ जी के बैन

रं. रा. तिवारी

कलेचा धर्म आनरिक सौंदर्य ! या धर्माला त्या 'धर्मींची' बंधने मान्वत नसतात. म्हणून तर करीमचा राम भीमसेनच्या आवाजात बाजूबद खोलीत राहतो. 'खाँसाहेबाची' एक प्रचड रांग सगीत साधनेचे दैवत बनून राहाते. या दैवताच्या वास्तवाचे कथेच्या अ-वास्तवाशी काही नाते जुळते का हे पाहाण्यासाठी वैताग-नगरीच्या विठ्ठलवाडीहून मिरजेला प्रयाण केले तेव्हा
'दे हाता या शरणागता' कानात उमलू लागले.

मिरजेचा बसथाबा, (म्हणजे बस स्टँड) बाहेर आल्यावर भल्या मोठ्या मियाभर चौकात मूठभर खाँसाहेब अब्दुल करीमखाँची उगीचच रागावल्या सारखी वाटणारी प्रतिमा

उगिच का ऽऽ कान्ता गाजता
उगिच का ऽऽऽऽ का ऽऽ न्ता गाजता
उगि ऽऽऽ च का ऽऽऽ

खाँसाहेबाच एक दैवत मिरासाहेब. खाँसाहेब कुठेही असले तरी मिरासाहेबांच्या उरूसाला न चुकता हजर राहायचे. तो मिरासाहेबांचा दर्गा कोठे आहे म्हणून कुणाला विचारावे असा विचार चालू असताना समोर एक अबे विकणारा बागवान आपल्या चार चाकीत पैसे मोजीत असलेला आढळला. त्याला विचारले.

'दर्गाशरीफ किधर है ?' दर्गाशरीफ म्हणताच अबेवाला उडी मारून समोर उभा राहिला.

'आप कहाँवाले साब है ?'

'हम मोमिनाबादवाले'. त्यान भलत्याच अगत्यानं दर्ग्याला जायचा रस्ता आणि खाणाखुणा सागितल्या. त्याला 'शुक्रिया' म्हणून चालू लागलो. आधी कबरस्थानच, फाटक, त्यानतर उदबत्ती, अरगजाची दुकानं आणि समोर पसरलेल्या मोकळ्या पटांगणात पाय रोवून बसलेल्या दर्ग्याच्या भिंती. दर्ग्याच्या लाबरुद पायऱ्यावर बसलेल्या एका माणसाने हाताने खुणवून जोडे त्याच्या बाजूला ठेवायचा इशारा केला. आजूबाजूला कोणी नव्हते. बूट काढताना विचार आला की 'बुटासकट जर ह्या गायब झाला तर'–म्हणून मग मोजे पायातच राहू दिले आणि दर्ग्याच्या आत पाऊल टाकल. भल्या मोठ्या घोलघुमटी वास्तूसमोर विस्तीर्ण चौक. चौकाच्या दोन्ही बाजूला प्रवाशाच्या उतरण्यासाठी ओवऱ्या आणि दर्ग्याच्या उजव्या बाजूला कबरस्थान.

प्रत्यक्ष दर्ग्यात हत्तीच्या पाठीएवढाल्या दोन कबरी. कबरीच्या चारीबाजून काचेची उचच उच तावदान. कबरीवर हिरव्या रगाच्या कापडाचे गिलाफर (अभ्रे) दोन चार भाविक भक्त डोळे मिटून मिरासाहेबाचे ध्यान करीत होते तर काही जण नमस्कार करून कबरीवर चढवलेली हळद चदन माथ्याला लावीत होते...दर्ग्याच्या बाहेर येऊन चारी बाजूने फेरी मारावी म्हणून मागच्या बाजूने दर्ग्याच्या डाव्या अगाकडे जात असताना किंकाळी कानावर आली. काय आहे पहावे म्हणून पुढे झालो. एका बाईला दोरखडाने बांधून दर्ग्याच्या पायऱ्यार टाकून दिले होते. बाई दाताने दोरखंड चावीत होती. धारदार नाक ! उभट चेहरा ! बारीक पण तीक्ष्ण डोळे. लाबसडक केस अगभर पसरलेले. वस्त्र अस्ताव्यस्त झाल्यामुळे माड्या उन्हात चमकत होत्या. तोडातून विचित्र चीत्कार निघत होता. दहावीस फुटावर पाच-पचवीस बायामाणसे उकिडव्या बसून बाईकडे पाहात होती. बाई बहुतेक कर्नाटकातली असावी. मिरा-साहेबांच्या त्या दर्ग्याच्या त्या पायरीवर भूतबाधा झालेल्याना सोडल्याने भूतपिशाच्चे पळून जातात अशी लोकाची श्रद्धा.

फ्राइड-मॅनिया उफाळून वर येण्यापूर्वी दर्ग्याच्या बाहेर आलो. बूट जिथल्या तिथे. राखण करणाऱ्याला दहा पैसे दिले आणि बुटाचे बद बाधता बांधता विचारणा केली, 'ये दर्गा कितना पुराना है ?' प्रश्नाच्या उत्तरात त्याने मोकळ्या चेहऱ्याने (Blank face) माझ्या कडे पाहिले.

'क्या है की...
'फिर इसकी देखभाल...?
'मुजावर लोगो है, उनो करते.
'वो किधर है ?
'रहते इधरच. वो दफ्तर है.

दफ्तरकडे जाऊन पाहिले, ते बंद होते. मन खट्टू झाले. कॅमेरा तसाच पडून होता. काहीच माहिती मिळत नव्हती. विचार केला माधवनगरला तरी जाऊन यावे. दर्ग्याच्या समोरचे पटागण ओलाडून एखादा बस थाबा दिसतो का ते पाहू लागलो. सडकेच्या वळणावर एका विजेच्या खाबावर बस थाब्याची पाटी होती. जवळच एका पानाच्या दुकानासमोर टाकलेल्या एका बाकड्यावर दोन माणसे बसली होती.

'माधवनगर को बस यहाँसे जाती है ना ?'

'नही, नही. पहले यहाँसे सांगली जाओ. फिर वहाँसे माधवनगर-वाली बस मिलेगी.'

'अच्छा' म्हणून पानवाल्याकडे पाहू लागलो. दुकानात थोडी विड्याची बडल आणि सिग्रेटची काही पाकिटे होती. पानवाला म्हातारा दुकानदार जाडभिंगाच्या तुटक्या चष्म्यातून खाली पाहात पानाला चुना लावीत होता. डोक्यावर मळकट रगाची तपकिरी टोपी, काळा लावट चेहरा. दात पडल्यामुळे गाल आत गेलेले. कृश शरीर,

सत्तरीच्या आसपासच्या खुणा दाखवणार. त्याच्याकडून काही हाती लागते का पहावे म्हणून त्याला विचारले, 'क्यों, चाचा ये दर्गा कितना पुराना है ?'

: ये मिरासाब का दर्गा ? ये सात सौ साल पुराना है.

: सात सौ ?' म्हणजे किती ? स्वरात स्वाभाविकपणे आश्चर्य जाणवत होतं.

: हाव. तुमी क्या समझे ? भोत पुराना है. ह्यां पयले मन्दर था– मिरगा देवी का मदिर. मिरगा देवी के नामसे ये मिरच है. भोत बडा मदर था.

: भोत वडा याने... ?

: ह्राव ! दो मील तक छाँव जाती थी. झां तक छाँव जाती थी इस्लाम को पनपने नही देती थी. भोत कोशिश करे मदर को तोडनेकी. फिर काबा शरीफ से हुक्म हुवा...

: किसको... ?' मुमुक्षुतेने जिज्ञासा व्यक्त केली.

: मिरासाब को बोले तुमी जाव. तो मिरासाब आये. अठारा साल के तो थे. उनो आये. मदिर का पुजारी था गगण्या धोबी. जतर मतर भोत जानता था उनो. फिर उसकी और मिरासाब की चली. जम के चली. सुधरने नही दे रहा था गगण्या धोबी. मतर से जमीन का अलाव बनाया उनो. मिरासाब के पैरो जलने लगे. उदरसे एक मोची जा रहा था. मिरासाब बोले, भाई तू कौन ? तो वो बोलता मैं मोची. तब मिरासाब बोले तू हुमको जूते बनाके दे दे. उनो बोल्या मेरे पास धागा सुवा तो है मगर चमडा नही. और मुसलमानको जूते बनाकु देनेकी मनाही है मेरे धरम मे. तो मिरासाब बोले तू हमारा इत्ता काम कर हमभी कुचतो तोरा काम करीगे. तो मोची बोला चमडा देव तो बनाता. पर चमडा किदर था ? तो मिरासाब ने अपनी बाँयी माँडी का चमडा निकलकर उसकू दिये. उससे एक जूता बना. फिर दाँयी माडी का चमडा निकाल कर दिये उसकी एक पांवरी बनी. उसकू पेनकर मिरासाब गगण्या से लडने लगे. गगण्या हारने लगा. अखिरकू मिरासाब का मुरीद बन गया उनो. बादमे धोका किया, उनो तो उसकू मिरासाबने खतम कर दिया.

: मजार दो दिख रहे...

: है तो दोच है. एक ख्वाजा का और एक मिरासाब का. ख्वाजा मिरासाब के वालीद थे. उनो मोची जूते बनाके दिया ना उसका गिलाफ सबसे पयले चढता–

: कब ?

: उरूस के वखत. वो मोची बाजे बजाते धूमधामके आयेगा. सबसे पयले उसका गिलाफ मजार पर चढिग्या फिर दुसरेका. मिरच के म्हाराज बोले, ये क्या बात ? इनो मोची, उसका गिलाफ पयले क्यो ? हमारा गिलाफ पयले चढिग्या. तो उनो रेशम का गिलाफ बनाकर लाये. आप यकीन नही मानिंगे, गिलाफ मजारपर चढाने के साथ ह्यां जलकर खाक हो गया. मिरासाब बोलते, अरे इनो मोची हुया तो क्या हुवा ? इसको मैने ये मान दिया है. तबसे नही, किसीका नही, पयले मोची का गिलाफ और बादमे दुसरेका–

: अच्छा ? तो फिर कुछ नवस वगैरा लोगों करतेच होगे चाचाला बोलतं करण्यासाठी अजून एक किल्ली आवळली.

: भोत ! जुम्मेरात के दिन देखना, भोत लोगों आते. नवस करते, मन्नत मानते. मगर उसमें भी एक बात है. हिंदू की मन्नत जित्ती चल्दी पूरी होती उत्ती मुसलमानकी नही होती.

: ये क्या बात ? मिरासाब को तो मुसलमान की मन्नत पहले पूरी करनी चाहिए–

: उसका क्या है, अपुन मुसलमानो को तो जानाच पडेगा. किसीन किसी बहाने गये बगैर नही चलता. मिरासाब बोलते ये हिंदवाँ कब आनेवाले ? इनकी मन्नत पयले पूरी करना. दुसरी बात बोले तो हिंदवो फथरो पर जल्दी यकेन लाते हेते. जो जित्ता यकीन लाईंगा उसकी मुराद उत्ती जल्दी पूरी होगी. अब्बी देखो, गुजराती, मारवाडी सब आते. हिंदवोच ज्यादा हेते. बमना पयले नही आते थे. अब उनो बी आने लगे. किसी को पैसा, किसीको नोकरी, किसीको तरक्की, किसीको बालबच्चा–मिरासाब के दरबार में जो माँगो सो मिलता.

: अच्छा हुआ आपसे बाते करनेका मौका मिल गया' मी चाचाची तारीफ करू लागलो,

: 'वहाँ तो कोई भी ये सब बाते नही बताता–'

: 'दर्गा के पाच सौ मुजावरों है. लेकिन सब लाओ लाओ करते न्हेते. ये सब उनको कहाँ मालूम ! बुजुर्ग लोगो जानते लेकिन–'

: 'ये तो सच है, मैं किसी बुजुर्ग से नही मिला.'

: हौव, नही तो उनो बताते थे.

मध्येच एक मुलगा चारमिनार आणि विड्या घ्यायला आला. त्याला चाचान वेगवेगळे पैसे परत देऊन नीट समजावून हिशोब सागितला. मलाही पान खाण्याची हुक्की आली. मी चाचा समोर पैसे ठेऊन पान मागितल. चाचान पान दिलं पण पैसे घेतले नाहीत. 'न्हेन देव–न्हेन देव'

. फिर उरूस तो बडा होता होगा–

फिर ? भोत बडा ! दूर दूर से लोगो आते...

. उसमें कुछ गाना–बजाना होता कि नही...

: होता है... हर साल होता है. पयले अब्दुल करीम खाँसाब थे तक उनो करते थे... अब वो आती है हिराबाई... तुम नाम सुने होगे...

: हरसाल आती क्या ?

· फिर ? आनेकोच होना हरसाल– आकर हाजरी लगाकर फिर जाती.

: अब्दुल करीम खाँसाब को आपने देखा सुना...

: अपनी आँखो देखी बाते है. और सुनाभी भोत बार. ये हाथभर जरी का पटका, सादा पटका तो कब्बी नही पयने उनो. दर्गा को आते तो बिलाजूते–बिल्कुल नगे पैर. उरूस मे खुद भी गाते– दूसरोको भी गाने को बोलते. गाना, बजाना फिर फकिरोको खाना खिलाना. पाच पाच सौ फकीरोको खाना खिलाते थे उनो–

: दूसरे लोगो कौन गाते– चाचाला चालना दिली.

भोत थे. उनके शिष्यभी भोत थे. फिर आसपास के गावों से बेंडबाजेवाले, ताशेवाले आते. खाँ साब उनका काम्पिटिशन लगाते थे. एक वार कुफाड्या का रसूल आया,

: कुफाड्या–?

: ये कुफाड्या ! नजदीक है. हाथ जोडकर खाँसाब को बोल्या.

खाँसाब मेरेकू दसमिनट ताशा बजाने की इजाजत देव. तो खाँसाब बोले क्यों भाई ? क्या मिरच मे ताशेवाले नही है क्या ? भोत है. फिर तेरे मे ऐसी क्या खासबात ? कुफाडचा का रसूल बोल्या आप सिर्फ दस मिनट देव. तो फिर खाँसाब बोले ठीक है. उनो क्या बजाया जानते है ? मी नकारार्थी मान हलवली.

: अरे उनो अलीफ का सुरा ताशे पर बजाया– कुरान की आयत को ताशेपर बजाना क्या हँसी खेल है क्या ? खाँ साब उसकू बोले तुम यही रह जाव ओर रोज ताशा बजाव. वो ह्यांच रह गया–

'खाँसाब कैसे गाते थे ?' चाचा रंगात आलाच होता.

: उनका क्या कहना ? आवाज में भोत मिठास हती. फिर कभी कभी रहमतखाँ भी आजाते थे. उनो वली थे. उनको कोई बोल्या की खाँसाब गाना गाव तो बोलते थे क्यो, मै क्या तुम्हारे बाप का नौकर हूँ ? दिल चाहिंगा तब गाऊँगा। कई वार ऐसा होता इन्हो टट्टी जा रहे और गाना शुरू होजाता. फिर पेटी, तबला सब वहीच इन्तजाम करना. अपरस भी लोगोच देना. अवलिया थे. अल्ला के बदे. उसका हुकूम हुआ तो गाना. खाँसाब इनसे राय मशवर करते थे....

: खाँसाब को पैसा तो अच्छा मिला होगा–

: भोत ! भोत कमाये. राजा-महाराज भोत पैसे देना मगर इनका ढंगीच अलग था. पैसा कमाना और बांट देना. एक बार इनकमटॅक्स के अपसराँ इनके ह्याँ गये और बोले, 'खाँसाब आप इनकमटॅक्स नही देते. खाँसाब बोले भई बात तो बराबर है. तुम पहले खाना खाव फिर जो हिसाब किताब होगा देखलेना. खाना हुआ. खाँसाब बोले, भई वो हिसाब की चोपडी लाव. इनकमटॅक्स के अपसराँ देखने लगे. एक प्रोग्राम मस्जिदको एक मदरको ये क्या बात ? एक मदिर को एक मस्जिदको. 'तो फिर...' खाँसाब बोले, अरे तुम क्या समझे कलाकारको ? उनो फकीर होता है फकीर ! उसका अकौट देखनेकू आ गये तुमकू शर्म आने को होना. कलाकार को तुम क्या समझे ! बेचारे अफसराँ माफ करो खाँसाब बोलकर हात जोडते गये...

: लेकिन मंदिरके लिये खाँसाब प्रोग्राम देते थे...?

: क्यों उसमे क्या ? कोई गया और खाँसाब को बोल्या कि फलाँ फलाँ देवलका काम करना है. पैसा होना. खाँसाब बोलते थे कि एक पोरगराम तुम को दिया– जो आये सो ले लेना. हिंदू-मुसलमान ऐसा भेदभाव उनमे नही था–

माझ्या डोळ्यासमोर आर्य सगीत विद्यालयाची पाटी फिरू लागली. खाँसाहेबानी सगीत शिक्षण देण्यासाठी या सस्थेची स्थापना केली होती आणि आपल्या खर्चाने विद्यार्थ्यांच्या खाण्यापिण्यापासून कपडयालत्त्यापर्यंतची ते सोय करीत. त्यात हिंदू-मुसलमान असा भेद त्यांनी कधी केला नाही. अट फक्त एवढीच की राहाणाऱ्याने सात वर्षांपर्यंत राहून सगीताचे शिक्षण घेतले पाहिजे. स्वत:च्या खर्चाने विद्यार्थ्यांना ठेऊन घेऊन त्याना सगीत शिकवणारे उस्ताद– अब्दुल करीमखाँ !

'हमारे मिरच में ये भेदभाव नही है.' चाचाचा चष्मा राजकारणाकडे वळला, 'तुम सुने क्या कभी मिरज में हिंदू-मुसलमान का झगडा हुवा बोलकर ? भिवडी, मालेगाव, हर जगह झगडा होता मगर मिरच में कब्बी नही होगा. कोई मुसलमान का छोकरा किसी हिंदूको तकलीफ दे रहा तो मुसलमान कैच बुर्जुग उसको डाटिंगे, 'क्यो भाई कायकू तकलीफ दे रहा ? हम एक वतन में रहेते तो एक दुसरेके भाईयाँ हुए कि नही ? वैसाच हिंदू भी बोलींगे. कुच महासबावाले है लेकिन हम उनको बोले ये झगडे इदर मत लाव. शिवसेनावाले भी आये; मगर कूच हुआ नही. वो सुकनिवास है-होटल ? उसके मालिक को सतारचे थे– वो बोला मारपीट मत करो मै जाता. तो मिरचके हिंदू-मुसलमान मिलकर उसकू बोले किदर नयी जानेका – हम है. तीस चालीस साल पयले उनो ह्याँ आये. तीन भाइयो. एक गल्लेपर बैठना, एक भट्टीपर और एक ऊपरके कामकू. मेहनत करे, पैसा कमाये. अरे तुम करो, कमाव पैसे कोई नको बोलता क्या ? मेरेकू अच्छी तन्हा पैचानते. कब्बी गये तो आव चाचा बोलते...'

: तो फिर काँग्रेसवाले... 'शेवटी चाचा आहे तरी कोणत्या पार्टीचा हे जाणून घेण्यासाठी मी अधातरी प्रश्न टाकला.

: उनकीबी नयी चलती. वैसे मिरच में झगडा नयी है लेकिन हाँ रियासत (शासन) के साथ हमारा जरूर झगडा है. एक बी मिनिस्टर नयी आ सकता इदर. हम आनेच नयी देते. हम उनको बोलते, अरे तुम क्या करे ? अमीराँ गाडाच भरे की नये ? तुम क्या किये हमारे लिये–बोलो ? क्या शक्कर सस्ती करे क्या तेल सस्ता करे ? क्या करे तुम–?

: तो फिर चुनाव में कैसे–?

वो डाक्टर पाठक है– उसको हम चुन कर दिये. उसकी परचार सबा मे तकदीर करते थे तो सब कचते थे डाक्टर पाठक को एक मत और एक रुपया देव. सत्तर हजार रुपये दिये लोगोने.

: सत्तर हजार ?

: फिर ? तुम क्या समझे !

मतासाठी पैसे वाटणे ही सर्वसामान्य वस्तुस्थिती. तिला मोठमोठाले नेतेही अपवाद नाहीत, हे एक ओपन सिक्रेट. अशात मतदारानी उमेदवाराला स्वत:हून रुपये देणे आणि तेही थोडथोडके नाही तर सत्तर हजार – अद्भुतरम्य कथा ऐकल्यासारख वाटू लागल.

: तो, डॉक्टर पाठक अच्छा काम करते होंगे....

: अब उनो बेचारे तो क्या करना ? ये बदमाशो करने देना तो अकेला आदमी – सुदरने नयी देते ये लोगां–

सत्तेच्या धुंदीत बेताल झालेल्या आधळ्या बहुमताबरोबर झगडणं सोप नाही याची हताश जाणीव चाचाच्या चेहऱ्यावर पसरली.

'नही सुधरने देते, नही'

'नयी तो क्या ?' चाचा अतर्मुख झाले.

तेवढयात सांगलीकडे जाणारी बस आली. चाचाला आदा दर्ज करून बस धरली. सांगली, माधवनगर; माधवनगर, सागली. परत मिरज. सगळ्या रस्त्यात चाचाचा चेहरा आणि विचार डोक्यात घोळत राहिले. मिरगादेवीच्या दोन मैल सावली पसरणाऱ्या मदिरापासून कलाकार फकीर होता हे फकीरपर्यंत आणि भेदभाव न मानणाऱ्या मिरजकरांनी डॉ. पाठकाना सत्तर हजार रुपये देण्यापर्यंतचा सातशे वर्षांचा इतिहास आणि सत्तर वर्षांचा युसूफ चाचा आणि त्याच्या दुकानात असलेली पाच-सात विडयाची बडलं–सगळं चक्रावून टाकणार होत.

चाचाचा फोटो घेतला नाही याची रुखरुख मनात होतीच. दर्ग्याचा फोटो नाही घेतला तरी चालेल. पण चाचाचा फोटो घेतला पाहिजे, असा विचार करूनच खाँसाहेब अब्दुल करीमखाँना कुफाड्याच्या रसूलविषयी विचारायची इच्छा मनात दाबून दर्ग्याकडे निघालो. खाँसाहेब बहुतेक शुद्ध सारंग आळवीत असावेत...

चाचाच्या पानाच्या दुकानाचा डबडा बंद होता. चालू घड्याळात अडीच वाजले होते. आता काय करावं? परत जावं? पण परतायला मन तयार होईना. मग चाचाचा वयस्क पुतण्या शोभेल अशा जवळच दुकान असलेल्या टेलरमास्तरला चाचाचा 'पत्ता' विचारून धनगर गल्लीकडे निघालो.

दुतर्फा मुसलमानांची घरं. दुपारची वेळ, पुरुषमंडळी बाहेर गेलेली, म्हणून महिला वर्ग थोड्या मोकळेपणानं घराच्या अंगणामध्ये पान खात, वेणीफणी करीत, काहीतरी निवडीत बसलेला. गव्हाळ रंगाच्या, नाकेल्या, जाडजूड बायका. तरण्याताठ्या जवान पोरी एकमेकींची मस्करी करीत खिदळत असलेल्या. युसूफचाचाच्या नावाची पाटी पहाण्यासाठी दाराकडे पाहाणं जरुरीचं होतं. तर ह्या पाहण्यात जनानखान्याच मुस्लीम तरीही महाराष्ट्रीय वळणाचं रसरशीत सौंदर्य दृष्टीस पडत होतं.

मनात भीती होतीच. एखादीनं 'क्यों जी, क्यों झांक रहे–घरमें माँबेन नही क्या?' म्हणून झटकलं तर करा काय!

तेवढ्यात समोरून युसूफचाचाचा चाचा शोभेल असे एक हजरत जाड भिंगाच्या चष्म्यातून दूरवर पाहात आणि हातातली काठी टुकटुक टेकीत येताना दिसले. त्यांना लवून आदादर्ज केला. शतकापूर्वीच्या तौरतरीक्यांना दुरावलेल्या मनाला तसल्ली वाटली असावी. मी विचारलेली माहिती मोठ्या आत्मीयतेने देत हजरत म्हणाले, 'वो बांबू पडे है ना, वोच युसूफ का मकान है' मी आदादर्ज केला. त्यांनी तो मोठ्या तत्परतेने परतवला. ही सरंजामशाहीची नजाकत आता सपुष्टात येऊ लागली आहे, असा एक नॉस्टेलजिक विचार मनात येत असतानाच मी युसूफचाचाच्या मकाणासमोर येऊन उभा राहिलो.

घरासमोरच्या कट्ट्यावर एक छोटीशी छोकरी शिळ्या करवंदाचे छोटे छोटे ढीग करून विकायला बसली होती. विकत घेणारे येत नसल्याने तिला झोप येत असावी. तिला युसूफचाचाला आतून बोलावून आण म्हणून सांगितलं–पण ती काही जाईना. तिला मनोमन तिच्या करवंदाची भीती वाटत असावी. ती गेली आणि मी खाल्ली तर.

'जा ऽऽ तो ऽऽ'

'नग ऽ मै नयी जाती–'

दुसरी एक बाई आत चालली होती. तिला सांगितलं. मग चाचा आले. झोपेतून उठून. पण टोपी, सदरा घालून. चष्मा तर हवाच.

ओटयावर धूळ होती पण तिथेच बसून चाचांनी सकाळी सांगितलेल्या गोष्टी पुन्हा त्यांच्या तोंडून थोडक्यात वदवून घेतल्या आणि त्यांचा एक फोटो घ्यायची इच्छा प्रदर्शित केली.

: 'नयी, फोटू नयी...'

: क्यो, उसमे क्या?

: मै पचनमाजी हूँ ना...

: 'हाव, पचनमाजी तो तसवीर नही देते...' तोच एक गोष्ट सुचली. सकाळी बोलता बोलता चाचांनी दुसऱ्या महायुद्धात त्यांनी 'सिव्हिल 'मधे ट्रक ड्रायव्हरचं काम केल्याचा उल्लेख केला होता. 'चाचा, आप ट्रक ड्रायव्हर थे तवे लायसेन्स के लिये तो तसबीर निकालीच होगी...

'हा, वो तो है...वो तो है...' मी चाचाला बरोबर पकडलं होतं.

'लेकिन वो लायसन्स मै अपने पास नयी रखता था. नबरच बोलनेका...

'फिर भी तसबीर दिये तो ठीक रहीगा...

'ऐसा बोलते... तो फिर लेव...' चाचा शर्टाची बटणं लावीत उभे राहिले.

फोटो घेतला, पण तो आलाच नाही. चाचाच पचनमाजीत्व अबाधित राह्यल.

परतताना दर्ग्यात गेलो. पायऱ्या वर आठ, दहाजण जोडे राखण्यासाठी बसले होते. जो तो खुणावू लागला. आता जोडे जायची भीती नव्हती. गगण्या धोबीचा पराभव करणाऱ्या मिरासाहेबांच्या दर्ग्याचा फोटो घेतला. लगतच्या कबरस्थानात जाऊन खाँसाहेब अब्दुल करीम खाँ आणि त्यांच्या पत्नी बनुबाई यांच्या कबरीचे फोटो घेतले, खाँसाहेबांच्या पुतळ्याला मुद्दाम वळसा घालून स्टॅन्डकडे निघालो. खाँसाहेबांची झिंझोटी पाठलाग करू लागली,

कासों कहूँ जी के बैं ऽऽऽ न
पिया ऽऽऽ बिन ना ऽऽ ही
आ ऽऽ वत चैन ऽऽ न

¤

विजापूर पंढरपूरला आलो. सध्याकाळ होत आली होती. क्वार्टर्समध्ये प्रवेश करीत असताना थालीपीठाचा खमंग वास नाकात शिरला.

'कशी काय झाली ट्रीप' थालीपीट खाताना चर्चा सुरू झाली. युसूफ चाचाचा किस्सा खमंग करून ऐकवला.

'तुम्हाला बरे युसूफ चाचा भेटतात!' यजमानीणबाई त्यांना आलेल्या कडवट अनुभवाचे वर्णन करू लागल्या. त्यांच्या मुस्लिम वर्गभगिनीला मूर्ती पूजेचं महत्त्व पटवण्यात त्यांना यश आलं नव्हतं आणि एकदा नकळत त्यांना मटणाचा पदार्थ खाऊ घालण्यात तिला अपयश आलं होतं.

'आणि आमचा हा ड्रायव्हर! जीप मधून खाली येत नाही पोरांना...'

'तरी पण युसूफ चाचा सारख्या मुसलमानांची सख्या वाढवण्यावर देशाचं स्थैर्य अवलंबून आहे हे तरी...

'ते काही नाही. सगळे एकजात सारखे असतात.

एखादं दुसऱ्या युसूफ चाचान काय होणार–?

थालीपीट करपून गेलं होतं.

युसूफ चाचा अशिक्षित.

अब्दुल करीमखाँ काय होते?

आणि आपण?

पुन्हा एकदा झिंझोटी घुमू लागली–

कासे कहूँ जी के बैं ऽऽऽ न
पिया ऽऽऽ बिन ना ऽऽ ही
आ ऽऽ वत चै ऽऽ न

□ □

# भारत आणि सिक्कीम यांचे नवे संबंध

वा. दा. रानडे

सिक्कीमच्या प्रतिनिधींना भारताच्या पार्लमेंटमध्ये प्रतिनिधित्व देणारे ३६ वे घटनादुरुस्ती बिल पार्लमेंटमध्ये नुकतेच पास झाले. हे बिल आवश्यक होते का? त्याच्या आतरराष्ट्रीय प्रतिक्रिया, भारताचे हिमालयीन राज्याशी असलेल्या संबंधावर त्याचे होणारे परिणाम या दृष्टीने या प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

पहिला प्रश्न पार्लमेंटचे अधिवेशन एक आठवडा लांबवून घाईघाईने हे बिल पास करून घेण्याची एवढी काय आवश्यकता होती? सिक्कीममध्ये तशा काही विशेष घटना घडल्या होत्या असे दिसत नाही. भारताच्या संस्थांमध्ये सिक्कीमला सहभागी होण्याची संधी मिळावी अशी इच्छा सिक्कीम असेंब्लीने व्यक्त केली होती. तिला मूर्त स्वरूप या बिलाने देण्यात आले आहे जे घडले आहे ते सिक्किमी लोकप्रतिनिधींच्या इच्छेनुसारच घडले आहे. त्यांना मान्य नसलेला कोणताही निर्णय भारताने त्यांच्यावर जबरदस्तीने लादलेला नाही. सिक्कीम भारतीय संघराज्याचा घटक नाही. त्याचे स्वतंत्र अस्तित्व आणि दर्जा या बिलाने कायम राखण्यात आला आहे. त्याला सहराज्याचा दर्जा दिला आहे. सिक्कीमचे संरक्षण, परराष्ट्र धोरण आणि दळणवळण या विषयाचा कारभार भारत सरकारकडे आतापर्यंत होता तसाच यापुढेही राहील. या बिलाने त्यात कोणताही बदल केलेला नाही.

काही घटनात्मक प्रश्न या बिलाने उपस्थित केले आहेत संघराज्याचा घटक नसलेल्या राज्याला पार्लमेंटमध्ये प्रतिनिधित्व देणे घटनेशी कितपत सुसंगत आहे हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भारताच्या अनेक अंतर्गत प्रश्नासंबंधी पार्लमेंटमध्ये होणारी चर्चा सिक्कीमचे प्रतिनिधी ऐकणार, त्यात भाग घेणार, मतदानही करणार. पण सिक्कीमच्या अंतर्गत कारभाराबाबत तसाच अधिकार भारतीय प्रतिनिधींना मात्र नाही. भारत व सिक्कीम यांच्यात निकटचे संबंध प्रस्थापित व्हावे हा या बिलाचा उद्देश असेल तर त्यासाठी समान संधी दोन्ही बाजूनी असली पाहिजे, एकतर्फी नव्हे, भारतीय पार्लमेंटात सिक्कीमला प्रतिनिधित्व द्यावयाचे तर सिक्कीम असेंब्लीत भारताला प्रतिनिधित्व का नको? सिक्कीममध्ये भारताचा चीफ पोलिटिकल ऑफिसर असतो हे खरे पण ते सरकारी पातळीवरील प्रतिनिधित्व झाले, लोक प्रतिनिधित्व नव्हे. सिक्कीमचे अंतर्गत प्रश्न अधिक जवळून समजून घेण्यात असेंब्लीमधील प्रतिनिधित्वाचा उपयोग होईल. पार्लमेंटमधील चर्चेत हा विचार कोणाही सभासदाने मांडलेला दिसला नाही.

भारतीय पार्लमेंटमध्ये बसावयाचे सिक्कीमचे प्रतिनिधी सिक्कीम असेंब्लीने निवडावे अशी मूळ बिलात तरतूद होती. त्याऐवजी तेथील लोकांनी ते निवडावेत ही दुरुस्ती मान्य करण्यात आली ते योग्यच झाले पण सिक्कीमच्या प्रतिनिधीला मतदानाचा हक्क असण्याची आवश्यकता आहे काय याचा फारसा विचार पार्लमेंटमधील चर्चेत झालेला दिसला नाही. सिक्कीम हा काही भारतीय संघराज्याचा घटक नाही. भारताशी अधिक जवळचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी भारताच्या अंतर्गत प्रश्नावर पार्लमेंटमध्ये होणारी चर्चा सिक्कीमच्या प्रतिनिधींने जरूर ऐकावी, त्यात भागही घ्यावा पण मतदानाचा हक्क त्याला कशासाठी द्यावयाचा? सिक्कीमच्या प्रतिनिधीला मतदानाचा हक्क हवा असेल तर सिक्कीमने सरळ भारतीय संघराज्याचा घटक झाले पाहिजे. सहकारी किंवा संलग्न सभासदाला मतदानाचा हक्क नसतो. अमेरिकन घटनेतील तरतुदी या दृष्टीने विचारात घेण्यासारख्या आहेत. पुर्टोरिकोचा एक प्रतिनिधी अमेरिकन प्रतिनिधीगृहात असतो, चर्चेत तो भाग घेतो पण त्याला मतदानाचा हक्क नसतो. कारण पुर्टोरिको अमेरिकन संघराज्याचा घटक नाही. हवाई बाबतही अशीच परिस्थिती होती. हवाई जोपर्यंत अमेरिकन संघराज्याचा घटक झालेला नव्हता तोपर्यंत अमेरिकन प्रतिनिधीगृहातील त्याच्या प्रतिनिधीस मतदानाचा हक्क नव्हता. सिक्कीमबाबत आपण अशाच प्रकारची तरतूद करायला हवी होती.

सिक्कीमसंबंधीच्या निर्णयाबाबत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही पातळ्यावर काही शंका व्यक्त करण्यात आल्या. भारतात त्यामुळे फुटीर प्रवृत्ती बळावतील काय, सिक्कीमसारखाच दर्जा आम्हाला मिळावा अशी मागणी भारतातील काही राज्ये, विशेषतः काश्मीर, तामिळनाडू करतील काय अशी एक शंका होती. भारतीय संघराज्याचे घटक असलेल्या राज्यांना असा दर्जा मागता येणार नाही व तो दिला जाणार नाही हे परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंगांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या शंका म्हणजे नेपाळ व भूतान ही हिमालयीन राज्ये आणि चीनशी आपल्या संबंधावर याचा कोणता परिणाम होईल? सिक्कीमच्या राजाला म्हणजेच चोग्यालला आपल्या बाजूस वळवून तेथे आपला प्रभाव वाढविण्याचे चीनचे प्रयत्न होते. पण चोग्याल केवळ नामधारी प्रमुख आहे, त्याच्या हाती काही राहिलेले नाही. आपल्याला आता सिक्कीममध्ये शिरकाव करता येणार नाही हे स्पष्ट झाल्याने सिक्कीम संबंधीच्या निर्णयास चीनने विरोध करणे स्वाभाविकच होते. रशिया व भारत यांच्या संगनमताने हा निर्णय झाला या चीनच्या प्रतिक्रियेतून रशियाबद्दल चीनला वाटणारी भीती व्यक्त झाली. वास्तविक रशियाचा या निर्णयाशी काही संबंध नाही. नेपाळमध्ये भारतविरोधी निदर्शने झाली. नेपाळच्या राष्ट्रीय पंचायतीत झालेल्या चर्चेत भारताने सिक्कीम गिळंकृत केला अशीही भाषा काही सभासदांनी वापरली पण सिक्कीमशी झालेल्या करारानुसारच भारताने हे निर्णय घेतले आहेत त्यात काही अंतस्थ हेतू नाही अशी प्रतिक्रिया सरकारी पातळीवर व्यक्त करण्यात आली. भूतानने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही

दोन संभाव्य घटना विचारात घेऊन भारताने याचवेळी हा निर्णय घेतला. चोग्यालला आपल्या बाजूला वळविण्याच्या चीनच्या प्रयत्नाचा उल्लेख वर केलाच आहे. दुसरी संभाव्य घटना म्हणजे सिक्कीम असेंब्लीने व्यक्त केलेल्या इच्छेला लागलीच प्रतिसाद दिला नाही तर सिक्कीम नेपाळकडे झुकण्याची शक्यता होती सिक्कीममध्ये बहुसंख्य लोक नेपाळी असून मूळ भूतियालेपचा लोक अल्पसंख्य आहेत. भारत आपल्याशी जवळचे संबंध प्रस्थापित करायला तयार नसेल तर आपण नेपाळशी जवळचे संबंध ठेवावे असे सिक्कीमला वाटले असते. सिक्कीम भारतापासून दूर गेले असते. या निर्णयाने ते टळले.

सर्व हिमालयीन राज्यांचा एकत्रित विचार करून त्यासंबंधी एकत्रित धोरण भारताने प्रथमपासूनच आखायला हवे होते. हिमालयीन राज्यांच्या महासंघाची योजना आखून त्यादृष्टीने पावले टाकायला हवी होती. तसे न केल्याने भारत व चीन या दोन्ही राष्ट्रांच्या फार जवळ नको व फार दूरही नको असे धोरण नेपाळ व भूतान यांनी स्वीकारले आहे. □

# सोलकढी

## □ सखारामायणातले नवे ‘ काण्ड ’

‘ **मा**णूस ’मधले ‘सोलकढी’ हे सदर वाचकाना फार आवडते, ही गोष्ट आता मला कळून चुकली आहे. माझ्या हजारो वाचकानीच तसे मला वेळोवेळी आवर्जून सागितले आहे. (या वाचकांना परमेश्वर दीर्घायुरारोग्य देवो.) इकडे मीसुद्धा स्वत साठी काही लिहीत नाही; माझ्या प्रियप्रिय वाचकासाठी सारे लिहितो. माझ्या आणि वाचकाच्या अशा परस्परप्रियाळ सबधामुळे, ‘ अनंतराव, तुम्ही अमुक विषयावर लिहा (ना, होऽ, गडे, बुवा)’ किंवा ‘अनतराव, तुम्ही तमुक विषयावर लिहू नका (बर, हां, प्लीज), असे मला सारखेच सागितले जाते. मी ऐकतो त्याचे. ऐकावे जनाचे आणि करावे मनाचे, असा दुटप्पीपणा माझ्या स्वभावात नाही.

आम्ही ‘ वासनाकाण्ड ’ या आगलाव्या विषयावर लिहायला असे खास लोकाग्रहास्तव सिद्ध झालो आहो. एरवी आमची याबाबतची मते (आणि मनगटे) जगजाहीर आहेत. ‘सखाराम बाइंडर’, ‘गिधाडे’, ‘अवध्य’, ‘घाशीराम कोतवाल’ यांना आम्ही आमचा हिसका दाखवला आहे. हिसकाहिसकीत आमच्या पक्षाचे सेन्सॉर बोर्ड आम्ही गमावले तरी या महन्मगल महाराष्ट्रदेशाची नीतिमत्ता सलामत राखली. महाराष्ट्रदेशाची नीतिमत्ता सलामत राखण्यासाठी पाचपचास सेन्सॉर बोर्डे गमवावी लागली तरी बेहत्तर. (पडद्यात ‘ हर हर महादेव ’ आणि ‘ दीन दीन ’चा गलका.)

मराठी नाटककारानी, आविष्कार-, स्वातत्र्याच्या नावाखाली रगभूमीवर प्रदर्शिलेले नागडे नाच बद पाडून आणि सर्वत्र नीतीचा फैलाव करून आम्ही नुकतेच कोठे कृतकृत्य होत्साते स्वस्थ बसलो होतो. पण सस्कृतिसरक्षक समाजसेवक फार काळ स्वस्थ राहू शकत नाही, हेच खरे. त्याचे असे झाले की कोणा महेश एलकुचवार नावाच्या अपश्चिम महाराष्ट्रातल्या एका नव्या नाटककाराने ‘ वासनाकाण्ड ’ नावाचे एक नवे (किंवा सनसनाटी, किंवा खळबळजनक) नाटक लिहिले. माझ्यापुरते, या नाटकाचे नाव मी ‘ वासनाकड ’ असे ठेवले आहे. माझ्या प्रिय वाचकाना हा नावबदल अधिक अर्थपूर्ण वाटेल, असा मला विश्वास वाटतो. असो. आजकाल, असे एखादे नवे नाटक प्रत्यक्ष लिहिले जाण्याआधीच दिग्दर्शकाने घेतलेले असते आणि त्याच्या पुढल्या व्यवस्थेला तो तत्परतेने लागतो. ‘ अवध्य ’ या वयात आलेल्या पहिल्या मराठी नाटकाचे यशस्वी व अल्पवयीन दिग्दर्शक आणि त्याच नाटकातल्या जाळीच्या पडद्यामागचे यशस्वी व अर्धचड्डीन नट अमोल पालेकर यानी एलकुचवाराचे प्रस्तुत नाटक मोठ्या अपेक्षेने बसवायला घेतले. (या अपेक्षा पुढे यथासाग पुऱ्या झाल्या, हे सागावयास आम्हास अतीव दु.ख होते आहे ) तोपर्यंत सहा जाणकार आणि पुरोगामी व्यक्तीचे एक नाटचप्रयोग-परिनिरीक्षण मडळ नव्याने अवतरले होते. ‘ वासनाकड ’ अनुमतीसाठी मडळापुढे आले. मडळाने, महाराष्ट्रातल्या प्रचलित नीतिमत्तेचा कौल घऊन, ‘ वासनाकड ’ला अनुमती नाकारली. दृष्ट काढल्यावर जसे वाटते ना, तसे मला वाटले.

पण दरम्यान पालेकरानी ‘ रवीन्द्र नाटचगृह ’, ‘ वासनाकड ’च्या तीन प्रयोगासाठी आगाऊ राखून ठेवले होते. ‘ रवीन्द्र ’ हे तर पडले सरकारी नाटचगृह. परिनिरीक्षणमडळाने अनुमती नाकारलेले नाटक ‘ रवीन्द्र ’ला टेचात आणि टिच्चून होऊ देणे सरकारला कसेसेच वाटू कागले. म्हणून सरकारने ‘ रवीन्द्र ’मध्ये या (नीति बिघडाऊ) नाटकाचे खासगीसुद्धा प्रयोग करता येणार नाहीत, असे अमोल पालेकराना कळवले. आता पालेकरांना चेव चढला. आविष्कारस्वातत्र्याचा गळा घोटणाऱ्या अविवेकी दडपशाहीविरुद्ध उभे ठाकण्याची दुर्मिळ सधी त्याना मिळाली होती. कोणता जातिवत मराठी नाटचदिग्दर्शक अशी सधी गमावेल हो ? त्यामुळे ‘ अन्याय अन्याय ’ असा नाटचपूर्ण टाहो फोडत अमोल पालेकर सरळ न्यायालयात गेले आणि त्यांनी सरकारला तिथे खेचले.

असे काही झाल्यास आपल्या जातीपातीचे शिपाईशिलेदार आपल्यामागे असावे या हिशोबात अमोल पालेकरानी रगीत तालमीच्या नावाने ‘ वासनाकड ’चा एक गुप्त प्रयोग, एका गुप्त ठिकाणी, निवडक निमत्रितासमोर, साकार केला होता. (या निमत्रितात कोणकोणकोणकोण होते ते न सागितल्यामुळेच वाचकांना नेमके कळणार आहे, म्हणून मी सांगत नाही.) रगीत प्रयोग झाल्यावर, एका प्रश्नपत्रिकेच्या साहाय्याने, निमत्रिताची नाटकाबद्दलची मते गोळा करण्यात आली. (वास्तविक निमत्रित काही कोणी अल्बतेगल्बते नव्हते. असे ऐकून आहे की त्यातला/त्यातली प्रत्येकजण शेलका विचारवंत होता. असे असूनही आमच्यासारख्या सामान्य प्रेक्षकाच्या उताविळीने त्यानी ‘ वासनाकड ’ पाहिले न पाहिले तोच आपले मौलिक मत लेखी नमूद करून वर सहीशिक्कामोर्तबही केले. केवढी ही बाधिलकी ! ) ज्यांनी हा गुप्त प्रयोग पाहिला ते भाग्यवत घरी जातील आणि ‘ वासनाकड ’वर काही ना काही लिहून ते देशोदेशीच्या विविधभाषी नियतकालिकाकडे पाठवतील आणि मग दशदिशातून ‘ वासनाकड ’–‘ वासनाकड ’ असा घोप घुमघुमत राहील, असे या पालेकरदापत्याला वाटले होते की काय कुणास ठाऊक ! (मला तसे ठाऊक आहे, पण मी तसे सागणार नाही )

अमोलभाऊ आणि अनुयाताई पालेकराना न्यायालयात सोडून पुष्कळच समय लोटला. न्यायालयात त्याचे काय चालले होते बरे ? ‘ रवीन्द्र ’मधल्या आगाऊ जाहीर केलेल्या प्रयोगाना महाराष्ट्रशासन आकसाने आणि हडेलहप्पीने परवानगी नाकारत आहे, हे न्यायाधीशमहाराजाना ते पटवून देत होते. त्याना ते पटले. पहिल्या प्रयोगाला परवानगी मिळाली. सरकारने लगेच वरच्या पातळीवर दाद मागितली. त्यामुळे दुसरा व तिसरा प्रयोग होण्याआधीच सगळीकडे उत्कठा भरूर राहिली. वरिष्ठ पातळीनेसुद्धा सरकारविरुद्ध निकाल दिला. ‘ सखाराम बाइंडर ’च्या वेळी जे झाले तसेच पुन्हा घडत होते. सखारामायणातले हे, एलकुचवार–पालेकरानी सपादिलेले

वासनाकाण्ड, असे लोकांसमोर आले.

अर्थात तिकिटे लावून त्याचे जाहीर प्रदर्शन करायला परवानगी नव्हतीच. पण गोष्ट जेवढी खासगी तेवढी ओढ जास्त. त्यामुळे सरकारच्या टकलावर टिमकी मारून झालेल्या 'वासनाकड'च्या या तीन 'खाज'गी प्रयोगांना रसिक सभासदानी गर्दी केली. ज्या खाजगी सस्थासाठी हे प्रयोग झाले त्याना पुष्कळ नवे सभासद अचानक मिळाले. अधिकृत प्रवेशपत्रिका नसल्यामुळे आत प्रवेश न मिळालेल्या आशाळभूत रसिकाच्या थारोळ्यांनी रवीन्द्र नाटचमदिराचे बाहेरचे प्रांगण दर दिवशी नुसते फुलून जायचे. सिद्धीविनायकाच्या देवळाची एक शाखा तेथे उघडली असावी असेच मला ती व्याकुळ गर्दी पाहून वाटले होते पोलीसबदोबस्त होताच. अनधिकृतानी आत प्रवेश मिळवू नये, अशी विनतीवजा सूचना बाहेरच्या फळयावर लिहिलेली होती. द्वाररक्षक डोळयात तेल घालून (—तेल महागल्यामुळे हल्ली हा वाक्प्रयोग मी तेला-इतकाच जपून वापरतो.) सभासदपत्रिका तपासत होते. सभासदपत्रिका नसल्यामुळे खुद्द रा. रा. रा. रा. (म्हणजे राजमान्य राजश्री राजवर्खी राजाराम) हुमणेसाहेबाना-सुद्धा हे नाटक रवीद्र नाट्यमंदिराच्या गाभाऱ्यातून पाहता आले नाही; मग बाकीच्या चिल्लर खुमण्याफुमण्याचे तेच झाले हे वेगळे सागायची गरज नाही.

'वासनाकड'च्या 'रवीन्द्र'मधल्या प्रयोगाना परवानगी दिल्यास नीतिमान, संस्कृतिसरक्षक आणि लिंगनिर्मूलनेच्छू मराठी प्रेक्षक दंगल-दाडगाई करतील; त्यामुळे नाटचमदिरातल्या मौल्यवान चीजवस्तूची मोडतोड होईल; मागे 'सखाराम बाइंडर'च्या वेळी तसे झालेले आहे, एवढयासाठी (तरी) अशी परवानगी नाकारावी, असा युक्तिवाद न्यायालयात सरकारतर्फे करण्यात आला होता. प्रत्यक्षात तसे काहीच घडले नाही. नाटचमदिर आधी होते तसेच नतरही राहिले.

नाटचमदिराचे ठीक आहे हो; पण शेकडो प्रेक्षकाच्या मनोमदिरातल्या महन्मगल मूल्यांची मोडतोड झाली त्याचे काय? भावाबहिणीचे नाते हा भारतीय सस्कृतीचा आम्हाला मिळालेला एक उदात्तोज्ज्वल वारसा आहे. भावाबहिणीचे निर्हेतुक प्रेम हा आमच्या भावजीवनातला एक रम्यमधुर सकेत आहे: 'वासनाकड'ने याची कुचेष्टा केली आहे. अशा कुचेष्टेला सरकारी न्याया-लयाची मान्यता मिळाली तरी जनतेच्या न्यायालयात तिला योग्य ते शासन होईल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

तसे ते झाले नाही तर रक्षाबधन आणि भाऊबीज या जुन्या सणाचे पारंपरिक स्वरूप बदलून त्याना नवे व कलात्मक स्वरूप द्यावे लागेल.

त्याला आम्ही तयार आहोत काय?

## ☐ तारुण्य आता जागे झाले आहे

भारतीय तरुण आता जागा झाला आहे, असे मी परवा ऐकले. ही गोष्ट मी गेली पचवीस-तीस वर्षे सारखी ऐकत आलो आहे. त्याआधीसुद्धा अनतरावाच्या खापरअनत-रावांनीवगैरे ही गोष्ट ऐकलेली असणार. तरी या गोष्टीची गमत अशी की प्रत्येकवेळी ती नवी वाटते. कोणी झाले तरी झोप सपवणे आणि जागे होणे हे अदभुतच आहे. (माझ्या बाबतीत हे अदभुत दिवसातून तीन-चार वेळा घडत असते) तरुणाच्या बाबतीत ते विशेषच अदभुत आहे. कारण तरुणपणी झोप चागली लाबलचक आणि गाढगडद लागते. त्यात पुन्हा विविधरगी स्वप्नाची सरबराई त्याना करावी लागते. खरे तर तारुण्याने पुन्हा पुन्हा जागे व्हायचे ते पुन्हा पुन्हा झोपण्यासाठीच.

पण एखादी वेळच अशी असते की त्यावेळी तारुण्य जागे होते आणि जागेच रहाते भारतात सध्या तशी वेळ आली आहे, असे म्हणतात, ते खरेच असावे, अशी दाट शका माझ्या मनाला चाटून जाते आहे. कारण तारुण्याने सबध देशभर ढामढुमढमाक चालवली आहे. ९ ऑगस्ट रोजी दिल्लीला झालेल्या युवक कांग्रेसच्या मेळाव्याचेच पाहा

भारताच्या सर्व प्रातातून लाखो युवक या मेळाव्यासाठी एकत्र जमले होते. (तरुण सघटित झाला म्हणजे तो 'युवक' होतो की काय कुणास ठाऊक.) कांग्रेस ही म्हातारड्या-कोतारड्याची सघटना आहे, असे विरोधी पक्ष बुद्धीम हेकेखोरपणाने सतत म्हणत असतात. ती तशी नाही हे या युवक-मेळा-व्याने बिनतोड सिद्ध केले आहे. त्यामुळे भारतीय युवकवर्ग आपल्याच पाठीशी उभा आहे अशी हाकाटी करणाऱ्या सेनापती जय-प्रकाशाची (बाळासाहेब, आपले बिरुद त्या छोटया बिहारी नेत्याला लावले त्याबद्दल क्षमा करा. जय महाराष्ट्र!) चिक्की चिघळू लागली आहे. सरळ कांग्रेसमध्येच जाणे, परत सर्वोदयात जाणे, आणि अटळ विस्मृतीत जाणे: जाण्याचे हे तीनच मार्ग जयप्रकाशांसमोर आता उरले आहेत.

दिल्लीला भरलेल्या युवक कांग्रेसच्या मेळा-व्याला असे ऐतिहासिक महत्त्व येणार आहे, हे माझ्या एकटयाच्याच लक्षात आले आहे, असे मला नाईलाजाने म्हणावे लागते आहे. याचे साधे कारण असे असावे की तात्का-लिकापलीकडे पाहायची सावधगिरी मी घेतो; बाकीचे तात्कालिकातच गुरफटतात.

तात्कालिकातच गुरफटल्यामुळे बाकी-च्यानी या मेळाव्याच्या आनुषंगिक अगावर लिहिण्याबोलण्यात स्वतःला शिणवले. युवक कांग्रेसच्या कार्यकर्त्यांनी, या मेळाव्याच्या निमित्ताने, थोडी धूमदडेली माजवली, मौज-मिठाई खाल्ली, सहलसहेली केली, त्यात एवढे बिथरून जाण्यासारखे खरोखर काय होते? पण सगळया सोवळयाओवळया छाप्यात पाहावे ती युवक कांग्रेसला उलटे टांगून खाली मिरच्याची धुरी घातलेली. नाही म्हणायला ८ सप्टेंबर १९७४ च्या साप्ताहिक 'सोबत'मध्ये 'स्पॉट लाईट' या सदरात प्रा. सदा दडवते यानी या एकूण प्रकरणाचा वेगळया व व्यापक भूमिकेतून विचार केला आहे (अ-वेगळया व अ-व्यापक भूमिकेतून विचार केला तर तो 'दडवते' कसला?) असो.

मुबई शहर कांग्रेस आणि महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस यानी आपले शेकडो प्रतिनिधी मेळाव्याला पाठवले होते. ज्या खास दोन गाडयांनी हे प्रतिनिधी गेले-आले त्या गाडयाना त्यांनी चाकावरची चगळकेंद्रे करून टाकली होती. त्याच्या चगळीचे जे चटक-मटक वृत्तात वाचायला मिळाले ते वाचताना, आपल्यालासुद्धा या चगळेच्या खोऱ्यात भुरटी वाटमारी करता आली असती तर किती झक्कास झाले असते, असा विचार, निसटता का होईना (हे आपले उगीच), मनात आला होता, हे मला कबूल केले पाहिजे. (मोठी माणसे आपल्या स्खलनशीलतेची अशी कबुली देतात हे मी पाहून ठेवले आहे.) मागे अशीच श्रीक्षेत्र मळवली येथे जी महायात्रा भरली होती तिच्यात गुलाल-बुक्का उधळ-ण्याची सधी आपण साधली नाही, याची चुटपुट अजून मनाला लागून राहिली आहे.

तात्पर्याची गोष्ट अशी की युवक कांग्रेसचे व्यावसायिक आणि हौशी कार्यकर्ते जागे आलेल्या युवकासारखे वागले. आता ते पुन्हा झोपणार नाहीत. कारण जागणाऱ्यासाठी जग जागते; झोपणाऱ्यांसाठी ते झोपूनच राहते; या सत्याचा पडताळा त्यानी घेतला आहे.

—अनंतराव



# विवेकभ्रष्ट वॉटरगेट प्रकरणाची धावती ओळख...

● वि. स. वाळिंबे

पैशाचे प्रचंड पाठबळ असल्याशिवाय निवडणूक जिंकता येत नाही हे जसे निक्सन यांना माहीत होते तसेच ते हेही जाणून होते की, केवळ पैसा यश मिळवायला पुरेसा पडत नाही. गेल्या दोन तपांच्या अनुभवांमुळे निक्सनना निवडणूक-तंत्र पूर्णपणे अवगत झाले होते. निवडणूक हे मतपेटीच्या मार्फत खेळले जाणारे युद्ध आहे अशीच त्यांची धारणा होती आणि युद्ध म्हटले की त्यात कशाचाच विधिनिषेध बाळगायचा नसतो हे जुने सूत्रही त्यांच्या ध्यानात होते.

कॅलिफोर्निया हे राज्य अमेरिकेत निवडणुकीच्या दृष्टीने मोठे अवघड क्षेत्र समजले जाते. कारण एक तर ते आकाराने मोठे आहे, शिवाय निरनिराळ्या देशातून अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी आलेल्या लोकांचा तेथे प्रामुख्याने भरणा झालेला असल्यामुळे मतदारांच्या मनोभूमिकेचा एकसंधपणा तेथे आढळत नाही. अशा कॅलिफोर्नियातूनच निक्सन यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाला प्रारंभ केला होता. सहाजिकच निवडणूक कशी जिंकायची असते या कलेत ते आता वाकबगार झालेले होते.

शिवाय चोटिनेरसारख्या मुरब्बी विधिज्ञाचे बोट धरूनच त्यांनी आपली प्रारंभीची वाटचाल केली होती. निवडून आलेल्या माणसासंबंधी लोकमत नंतर नाराज होते, कारण लोकांच्या सगळ्याच अपेक्षा पूर्ण करणे त्याला जमत नाही. लोकमानसाचा हा विशेष ध्यानात घेऊन चोटिनेरचे निक्सन यांना नेहमी सांगणे असे की, निवडणूक लढविणाऱ्याने स्वतःसंबंधी फारसे बोलू नये. त्याऐवजी आपल्याला विरोध करण्यासाठी उभा ठाकलेला उमेदवार किती बदमाश आहे हेच लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या प्रतिस्पर्ध्यांला आपण आपले शत्रू मानले की त्याच्यावर चिखलफेक करायला संकोच वाटायचे काहीच कारण नाही हा चोटिनेरचा सिद्धान्त निक्सनने आपल्या मनात ठसविला होता.

चोटिनेरचा निष्ठावंत शिष्य म्हणून निक्सन निवडणुकीच्या क्षेत्रात वावरत असल्यामुळे त्यांचा उल्लेख 'ट्रिकी डिक' असा करण्यात येई.

आपली ही प्रतिमा उजळली पाहिजे असे १९६९ मध्ये राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढविताना निक्सननी आपल्या मनाशी योजिले होते. पण, कळते परंतु वळत नाही अशीच निक्सन यांची त्यावेळी अवस्था झाली. विरोधकांना बदनाम करण्यातच त्यांची प्रचार-मोहीम खर्ची पडली होती.

१९७० मध्ये की बिस्केन येथे रिपब्लिकन पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक भरलेली असताना, निक्सननी आपल्या दोन वर्षापूर्वीच्या संकल्पांचा पुनरुच्चार केला. ते म्हणाले की, 'आता तर मी राष्ट्राध्यक्षपदावर विराजमान झालेला आहे. त्यामुळे १९७२ मध्ये होणारी निवडणूक लढविताना प्रतिस्पर्ध्याच्या चारित्र्यहननाचा मार्ग चोखाळायचा नाही असे मी ठरविले आहे.'

निक्सन यांना शालीन सभ्यतेची तीव्रतेने जाणीव व्हायला एक तात्कालिक कारण घडले होते. निरनिराळ्या वीस व्यवसायांची लोकमानसातील प्रतिष्ठा जाणून घेण्याचा प्रयत्न एका संस्थेने केला होता. यात राजकारणामध्ये वावरणाऱ्याला शेवटून दुसरा क्रमांक मिळाला होता. संस्कारशील नागरिकांना, निवडणुकीच्या तंत्र-मंत्रात प्रवीण असलेल्यासंबंधी काय वाटत आहे हे यामुळे दिसून आले. परंतु त्याचबरोबर हेही खरे असते की, सत्तासोपानाच्या सर्वांत वरच्या टोकावर पोहोचलेली व्यक्ती आणि तिच्या भोवताली वावरणारे राजकारणी यात फरक करण्याची सवयही लोकांच्या अंगवळणी पडलेली असते. सहाजिकच राष्ट्राध्यक्ष म्हणून आपल्यासंबंधी लोकांना आदर आहे हे निक्सन यांच्या ध्यानात आले आणि याच भावनेचा फायदा घेण्यासाठी की बिस्केन येथील बैठकीत त्यांनी

जाहीर केले होते, ' राष्ट्राध्यक्षाने प्रचार-युद्धाच्या नेहमीच्या पातळी-पासून अलिप्त राहिले पाहिजे असे मी मानतो. '

निक्सन यांनी एवढे औदार्य प्रकट करावे अशा घटना आतरराष्ट्रीय राजकारणात घडत होत्या. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपासून उफाळून आलेले शीतयुद्ध ओसरण्याच्या मार्गावर आलेले होते. अमेरिकेने आतापर्यंत शत्रुस्थानी मानलेल्या रशिया आणि चीन याच्यावरोबरच्या सबधाना नवे वळण देण्याची कामगिरी डॉ. हेन्री किसिंजर मोठ्या कुशलतेने पार पाडीत होते. त्यामुळे आपली फेरनिवड निश्चित आहे असे निक्सन यांनी मानावे यात अस्वाभाविक असे काहीही नव्हते

याच काळात चोटिनेरचे श्वेतभवनामध्ये जाणे-येणे सुरू झाले. आपल्या या जुन्या मार्गदर्शकाच्या सहवासाची निक्सन यानाही ओढ लागलेली आहे हे पाहून एलिचमान आणि हाल्डेमान काहीसे नाराज झाले. पण चोटिनेरला त्याची पर्वा नव्हती. निक्सनना ते हवेसे असल्यामुळे इतराच्या रागा-लोभाची दखल घेण्याची त्याना गरज वाटली नाही परतु त्यामुळे एलिचमान आणि हाल्डेमान स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. निवडणुकीमध्ये अनुचित दबाव आणल्याबद्दल या माणसाला एकदा सेनेटच्या चौकशी समितीपुढे उभे रहावे लागले होते असे चोटिनेरसबधी एलिचमान-हाल्डेमान कुजबुजू लागले. तरीही चोटिनेरसबधी श्वेतभवनातील इतर अधिकारी प्रतिकूल होत नाहीत हे दिसून येताच त्यानी, चोटिनेरने चार लग्ने केली आहेत हेही सागावयास कमी केले नाही तरीही चोटिनेरचा श्वेतभवनातील वावर ओसरला नाही

चोटिनेरच्या उपद्व्यापासबधी हाल्डेमान जरी रागाने बोलत असला तरी तो केवळ वैयक्तिक मत्सराचाच भाग होता. कारण हाल्डेमानचे आतापर्यंतचे जीवनही अशाच कारवाया करण्यात व्यतीत झाले होते. १९६२ मध्ये निक्सन कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरपदाची निवडणूक लढवीत असताना, हाल्डेमानने ' दी कमिटी फॉर दी प्रिझर्व्हेशन ऑफ डेमोक्रॅटिक पार्टी ' या बनावट सघटनेच्या वतीने डेमोक्रॅटिक पक्षाच्या पाच लाख सदस्याना पत्रे पाठविली. निक्सन याच्याविरुद्ध उभा असलेला डेमोक्रॅटिक पक्षाचा उमेदवार पॅट ब्राऊन याची सहानुभूती डाव्या गटांकडे झुकलेली आहे आणि म्हणून त्याची उमेदवारी डेमोक्रॅटिक पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांना मजूर नाही अशी खास बातमी हाल्डेमानने पत्रे पाठवून डेमोक्रॅटिक पक्षाच्या सदस्यांना कळविली.

एका खोट्या सस्थेचे नाव घेऊन आपल्याविरुद्ध करण्यात येत असलेला प्रचार पूर्णपणे खोटा आहे असे ब्राऊनने जाहीर केले. त्यामुळे रिपब्लिकन पक्षानेच हा बनाव केला असला पाहिजे असा सगळ्यांनी तर्क केला निक्सन यानी हा सशय अनाठायी असल्याचे सागितल्यामुळे हे प्रकरण तात्पुरते मिटले. परतु पुढे दोन वर्षानतर जेव्हा या प्रकरणाची चौकशी झाली तेव्हा निक्सन याच्या हाल्डेमान प्रभृती सहकाऱ्यानीच, डेमोक्रॅटिक पक्षाच्या सदस्याचा बुद्धिभ्रश करण्याचा हा प्रयत्न केल्याचे सिद्ध झाले. या अपप्रचारासाठी खुद्द निक्सननीच हाल्डेमानला सत्तर हजार डॉलर्स दिले होते.

असा हा हाल्डेमान, ' क्रीप 'च्या रूपाने पुन्हा एकदा, निक्सन यांना १९७२ मधील निवडणुकीत विजयी करायचे या निर्धाराने कामाला लागलेला होता. एलिचमान, जॉन मिचेल आणि कोल्सन हे त्याचे सहकारीही नवनव्या योजना आखण्यात दग झाले होते.

डेमोक्रॅटिक पक्षाने एखाद्या दुबळ्या व्यक्तीला उभे केले तर निक्सन याचा विजय निश्चित होईल हे ओळखून डेमोक्रॅटिक पक्षात तसा प्रचार करण्याच्या दृष्टीने हाल्डेमान आणि एलिचमान यांची पावले पडू लागली.

एडमड मस्की, ह्यूबर्ट हफ्री आणि एडवर्ड केनेडी या तिघांच्या नावाची चर्चा डेमोक्रॅटिक पक्षात होत होती. हे तिघेही असे होते की त्याच्याशी मुकाबला करणे निक्सन याना जड जाणार होते. त्याऐवजी डेमोक्रॅटिक पक्षाचे तिकीट मिळावे म्हणून धडपडणाऱ्या जॉर्ज मॅकगव्हर्नच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडली तर निक्सन याचा विजय अगोदरच निश्चित होणार होता. त्यामुळे डेमोक्रॅटिक पक्षातील विचारप्रवाह आपल्याला कळले पाहिजेत अशी व्यवस्था करण्याचे ' क्रीप 'ने ठरविले.

## मस्की विरुद्धची आघाडी

ही जबाबदारी सेग्रेटी याने घेतली. सैन्यातील नोकरीतून निवृत्त होऊन राजकारणात वावरण्याची आकाक्षा बाळगणाऱ्या सेग्रेटीला ' क्रीप 'ने चटकन हेरले आणि डोनाल्ड सिमन्स हे नाव धारण करून सेग्रेटीला देशभर प्रवासाला पाठविण्यात आले. ' क्रीप 'चा पसारा एवढा वाढलेला होता की तिच्या कार्यात आता एकसूत्रता आणणे कठीण होते. बरेच निर्णय बऱ्याच लोकाना ठाऊकच नसायचे. शिवाय जो तो दुसऱ्यावर मात करून निक्सनना खूश करायच्या प्रयत्नात होता. त्यामुळे सेग्रेटीकडे सोपविण्यात आलेली कामगिरी मोठ्या उत्साहाने जेब मॅग्रुडर यानेही स्वत कडे घेतली. काहीही झाले तरी एडमड मस्कीला तिकीट मिळता कामा नये यासाठी मॅग्रुडर त्याच्या मागावर फिरू लागला. मस्कीच्या हालचाली कानावर याव्यात म्हणून मॅग्रुडरने मस्कीच्या ड्रायव्हरला ' क्रीप 'च्या वतीने पैसे द्यायला प्रारभ केला. त्यामुळे मस्की कोठे जातो, कोणाला भेटतो याची बित्तबातमी मॅग्रुडरपर्यंत लगेच येऊन पोहोचू लागली. मस्की हा कसा बेभरवशाचा माणूस आहे याचे खरेखोटे किस्से सांगणारी पत्रे वृत्तपत्रातून प्रसिद्ध होऊ लागली. एका वृत्तपत्रात तर अशी बातमी प्रसिद्ध झाली की मस्कीची बायको डेमोक्रॅटिक पक्षाच्या इतर उमेदवारांसबधी घाणेरड्या शब्दात बोलत असते.

या बातमीने मस्की अक्षरशः हादरला. आपण जर या बातमीचा इन्कार केला नाही तर डेमोक्रॅटिक पक्षाचे आपल्याला तिकीट मिळणार नाही हे ओळखून त्याने ती बातमी ज्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती त्या वृत्तपत्राच्या कचेरीसमोर प्रचारसभा आयोजित केली. मॅग्रुडरची माणसे या सभेला हजर होतीच. मस्कीच्या भाषणातील एखाद-दुसरे वाक्य पुढे त्याच्या विरुद्ध वापरण्यासाठी उपयोगी पडते की काय हे जाणून घेण्यासाठी मॅग्रुडरची माणसे मस्कीचे भाषण लक्षपूर्वक ऐकत होती. आपली कशी खोटी बदनामी सुरू झालेली आहे सागता सागता मस्कीचा कठ दाटून आला आणि नतर तो अक्षरशः रडायलाच लागला.

' मॅग्रुडरचे काम झाले होते. मस्की रडत असल्याने छायाचित्र दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले. त्या छायाचित्राखाली

छापले होते–' मस्कीला निवडून द्या. नाही तर जन्मभर तो असा रडत बसेल.'

झाले, मस्की 'रडतराऊत' म्हणून ओळखला जाऊ लागला.

डेमोक्रॅटिक पक्षाचे तिकीट मिळावे म्हणून धडपणाऱ्या जॉर्ज वॉलेसला निष्प्रभ करण्यासाठी, मस्कीच्या खोटया सहीनिशी जी पत्रके काढण्यात आली त्यात म्हटले होते–' तुम्हाला हिटलर पसत असेल तर तुम्ही वॉलेसला निवडून द्या.'

वॉलेसला डेमोक्रॅटिक पक्षाचे तिकिट मिळाले नाही तर तो अपक्ष म्हणून उभा राहणार होता आणि रिपब्लिकन पक्षाला तेच हवे होते. त्यामुळेच निक्सन यानी आपल्या 'शत्रू'ची जी यादी केली होती तीत वॉलेसच्या नावाचा अतर्भाव केला होता. डेमोक्रॅटिक पक्षाच्या गोटात वॉलेसबद्दी अप्रीती वाढावी म्हणून जसा मस्कीच्या बनावट सहीचा वापर करण्यात आला तसाच प्रयोग ह्यूबर्ट हफ्रीवरही करण्यात आला. हफ्रीच्या सहीने अनेक प्रतिष्ठित नागरिकांना भोजनाचे निमत्रण धाडण्यात आले ते निमत्रण खरे मानून अनेकजण निमत्रणपत्रिकेत लिहिलेल्या ठिकाणी गोळा झाले, आणि तेथे हफ्री वा त्याच्या वतीने अन्य कोणीही हजर नाही हे पाहून हफ्रीला शिव्या देत निघून गले. हफ्री निग्रो लोकांना फुकट भोजन आणि मद्य देणार आहे असेही जाहीर करण्यात आले. ही माहिती खोटी आहे असे सागावे तर निग्रो लोक अपेक्षाभग झाल्याने आपल्यावर अधिकच रागावतील अशा पेचात हफ्री सापडला.

मस्कीने आपण उमेदवारी मागे घेत आहोत असे जाहीर करताच, वॉलेसविरुद्धच्या प्रचाराला जोर चढला. कारण त्याचा मनोदय दोन वर्षापूर्वीच निक्सनना कळला होता. त्यावेळी तो अलाबामाच्या गव्हर्नरपदासाठी उभा होता. रिपब्लिकन पक्षाचा तेथील प्रमुख जेम्स मार्टिन मुद्दाम वॉलेसला भेटायला गेला आणि म्हणाला, '१९७२-मधल्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी आपण उभे राहणार नाही असे जर तू आता कबूल करीत असशील तर या निवडणुकीमध्ये आमचा पक्ष तुला पाठिंबा देईल.'

अशी कोणतीही हमी द्यायचे वॉलेसने साफ नाकारले. म्हणून गव्हर्नरपदाच्या निवडणुकीत वॉलेस पराभूत व्हावा या प्रयत्नाला सुरुवात झाली. त्याच्या विरुद्ध उभ्या असलेल्या आल्बर्ट ब्रीवर याला रिपब्लिकन पक्षाने प्रचारासाठी साडेचार लाख डॉलर्स दिले. पण तरीही वॉलेस विजयी झाला. तेव्हापासून 'क्रीप'ने वॉलेसचा पाठलाग सोडलेला नव्हता. वॉलेसचा भाऊ जेराल्ड याने कर चुकविला असल्याची बातमी प्रसिद्ध करण्यात आली. त्यामुळे जेराल्डच्या वह्याची कर-अधिकाऱ्याकडून तपासणी करण्यात आली. जेरॉल्डवर करण्यात आलेला कर-बुडवेगिरीचा आरोप खोटा असल्याचे प्रसिद्ध होताच वॉलेसचा उत्साह दुणावला. त्यामुळे जर डेमोक्रॅटिक पक्षाने आपल्याला तिकिट दिले नाही तर आपण अपक्ष म्हणून उभे रहायचे असे त्याने आपल्या मनाशी निश्चित केले.

त्यामुळे मस्कीप्रमाणे वॉलेसही तूर्त तरी उपेक्षणीय व्यक्ती ठरली. एडवर्ड केनेडी एका सशयास्पद स्वरुपाच्या अपघातात गोवला गेल्या-मुळे त्यालाही डेमोक्रॅटिक पक्षाचे तिकीट मिळण्याचा उरलासुरला सभवही नाहीसा झाला. हंफ्री आणि मॅकगव्हर्न हे दोघेच मैदानात उरले. त्यापैकी मॅकगव्हर्न याला डेमोक्रॅटिक पक्षाचे तिकीट मिळणार असा रग दिसू लागला तेव्हा 'क्रीप'च्या सूत्रधारांना आपले उद्दिष्ट जवळ आल्याची खात्री वाटू लागली.

आणि या उत्साहाच्या भरात त्यानी एक धाडसी बेत आखला.

२२ मे, १९७२ या दिवशी वॉशिंग्टनमधल्या हॅमिल्टन मॅन्जर हॉटेलमध्ये हटने एक बैठक बोलाविली होती आणि या बैठकीसाठी त्याने काही क्युबन बडखोरानाही बोलाविले होते. मार्टिनेझ, डेड्रिएगो, रेनॉल्ड पिको आणि व्हर्जिलिओ गोन्झालेझ या चौघा क्युबन तरुणा-व्यतिरिक्त बार्कर आणि फ्रॅंक स्टर्जिस हेही या बैठकीला आले होते. हॉटेलच्या नोदवहीत प्रत्येकाने आपले खरे नाव नोदविले नव्हते. बार्कर फ्रॅन्क कार्टर झाला होता तर मार्टिनेझने जेने व्हाल्डेझ हे नाव धारण केले होते. डेडिएगाने जोसे पिएद्रा, स्टर्जिसने जोसेफ डी आल्बर्टा, पिकोने जो ग्रानडा आणि गोन्झालेझने राऊल गोडाय अशा स्वाक्षऱ्या ठोकल्या होत्या.

बार्करच्या खोलीत बैठकीचे कामकाज सुरू झाले. हट त्या लोकाना म्हणाला, 'वॉटरगेट इमारतीमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाची कचेरी आहे. तेथे आणि फर्स्ट स्ट्रीटवरच्या मॅकगव्हर्नच्या कचेरीत आपल्याला टेलिफोनवरील सभाषण मुद्रित करून ठेवणारी उपकरणे बसवायची आहेत हे काम तसे जोखमीचे आणि जबाबदारीचे आहे. म्हणून त्याची कोठेही वाच्यता होता कामा नये.'

## वॉटरगेटमधे प्रवेश

या कामाच्या बदल्यात भरपूर पैसे मिळणार असल्यामुळे सगळ्यानी हटच्या सूचनेला होकार भरला. २९ तारखेला हे सगळेजण वॉटरगेट हॉटेलमध्ये रहायला गेले. वॉटरगेट हॉटेलच्या समोर हॉवर्ड जॉन्सन हे हॉटेल आहे हटचा मित्र बाल्डविन यानेही त्या हॉटेलात खोली घेतली. दुपारच्या वेळी मॅककॉर्ड त्याला भेटायला आला. मॅककॉर्डने आपल्याबरोबर टेपरेकॉर्डर, वॉकी टॉकी, रेडियो रिसीव्हर, टेलिफोन-रिसीव्हरमध्ये बसवायची उपकरणे असे बरेच साहित्य आणले होते.

मॅककॉर्डने त्या साऱ्या वस्तू बाहेर काढल्या आणि तो बाल्ड-विनला म्हणाला, 'ही उपकरणे कशी वापरायची, कोठे वापरायची हे मी तुला दाखवितो.' त्याने टेबलावरचा टेलिफोन रिसीव्हर उचलला आणि त्यात ते लहानसे उपकरण बसवून दाखविले. नतर तो म्हणाला, 'बाल्डविन, समोर जे वॉटरगेट हॉटेल दिसत आहे ना, तेथल्या एका कचेरीत हे उपकरण बसवायचे आहे. यापुढे मी तुला बाल्डविन म्हणून सबोधणार नाही. तुझे नाव बिल जॉन्सन.''

थोडया वेळाने हट आणि लिडी तेथे आले मॅककॉर्डने बाल्डविनचा 'बिल जॉन्सन' म्हणून लिडीला परिचय करून दिला.

सध्याकाळी ते चौघेजण जेवायला वॉटरगेट हॉटेलमध्ये गेले. जेवण झाल्यावर ते तेथेच गप्पा मारीत बसले. जेवायला आलेले इतर लोक बाहेर पडल्यावर नोकरवर्गही घरी परतला. हंटने गोन्झा-लेझला बोलावून घेतले आणि ते दोघेजण कोणी पहात नाही याची खात्री करून घेतल्यावर मागच्या अधाऱ्या जिन्यावरून वर गेले. सहाव्या मजल्यावर डेमोक्रॅटिक पक्षाची कचेरी असल्यामुळे त्या मजल्यापाशी असलेले कुलूप उघडण्याचा गोन्झालेझने खूप प्रयत्न केला. पण काही केल्या ते उघडेना. रात्र बरीच झाल्यामुळे त्या दोघाना पुन्हा खाली येणेही शक्य नव्हते. म्हणून उजाडेपर्यंत ते तेथेच बसून राहिले.

मार्टिनेझ, स्टर्जिस आदि इतर मडळी फर्स्ट स्ट्रीटवरच्या, मॅकगव्हर्नच्या कचेरीकडे गेली होती. रस्त्यावरचा दिवा नेमका त्या इमारतीपाशीच होता. म्हणून त्याना इमारतीत प्रवेश करणे धोक्याचे वाटले. लिडीने रायफल काढली आणि दिवा फोडून टाकावा असे त्याच्या मनाने घेतले. मॅक्कॉर्ड त्याला म्हणाला, 'असला वेडेपणा करू नकोस. आता आपण परत जाऊ. पुन्हा इथे येताना दिव्याचा अडथळा होणार नाही अशी आधीच व्यवस्था करू.'

दुसऱ्या दिवशी हट आणि मॅक्कॉर्ड यानी डेमोक्रॅटिक पक्षाच्या कचेरीत कसा प्रवेश करता येईल या दृष्टीने पाहणी केली तेव्हा त्याना असे आढळून आले की कुलुपाला धक्का न लावताही कचेरीत प्रवेश करणे शक्य आहे. रात्री ते सगळेजण ठरल्याप्रमाणे सहाव्या मजल्यावर पोहोचले आणि किंचितही आवाज न करता त्यानी डेमोक्रॅटिक पक्षाच्या कचेरीत प्रवेश केला. आपल्या हाताचे ठसे ओळखता येऊ नयेत म्हणून त्यानी हातमोजे घातले होते. कागदपत्राची छायाचित्रे घेण्यासाठी कॅमेरा आणि टेलिफोनमध्ये बसवायचे उपकरण त्यानी आपल्या बरोबर आणले होते. डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष ओब्रायन याचा सेक्रेटरी फे ऑवेल याच्या खोलीत जाऊन मॅक्कॉर्डने त्याच्या टेलिफोनमध्ये ते उपकरण बसविले. स्पेन्सर ऑलिव्हर या दुसऱ्या एका पदाधिकाऱ्याची खोली जवळच होती तेथल्या टेलिफोनमध्येही तसेच दुसरे उपकरण बसविण्यात आले. बार्करने टॉर्चच्या प्रकाशात अनेक कागदपत्राची छायाचित्रे घेतली. हे सारे काम रात्री साडेतीन वाजेपर्यंत चालू होते

दुसऱ्या दिवशी मॅक्कॉर्ड आणि बाल्डविन हॉवर्ड जॉन्सन हॉटेलमधल्या खोलीमध्ये बसून वॉकीटॉकीवरून, डेमोक्रॅटिक पक्षाच्या त्या दोन फोनवरून होणारे बोलणे ऐकू लागले. पण नीट ऐकू येईना. म्हणजे नवी उपकरणे बसविणे आवश्यक होते.

पुन्हा बोलावणे येताच आपण येथे येऊ असे सागून मार्टिनेझ, गोन्झालेझ आदि सहकारी आपापल्या गावी परतले. हटचा निरोप जाताच सोळा जूनला ते वॉशिंग्टनला परत आले. बार्कर आणि मार्टिनेझ यानी वॉटरगेट हॉटेलमधील दोनशे चौदा क्रमाकाची आणि स्टर्जिस व गोन्झालेझ यानी तीनशे चौदा क्रमाकाची खोली घेतली.

## विल्सला संशय आला

रात्री पाऊणचा सुमार होता. फ्रॅन्क विल्स या पहारेकऱ्याने नेहमीप्रमाणे सर्व मजल्यावर फेरी मारून सर्व काही ठीक असल्याची खात्री करून घेतली. सहाव्या मजल्यावरच्या जिन्यापाशी त्याला काही टेप पडलेले आढळले. नोकर वर्गापैकी कोणीतरी हे टेप येथे विसरून गेला असला पाहिजे असे वाटल्यामुळे विल्सने ते गोळा केले आणि एका बाजूला ठेवून तो कॉफी पिण्यासाठी समोरच्या उपाहारगृहात गेला.

सहाव्या मजल्यावरचा दिवा मालविला गेला आहे हे समोरच्या हॉटेलमधील खोलीत ताटकळत बसलेल्या मॅक्कॉर्डने पाहताच तो बाहेर पडला आणि वॉटरगेट इमारतीत घुसला. गोन्झालेझ त्याचीच वाट पहात होता. आपण मघाशी येथे ठेवलेले टेप आढळत नाहीत हे पहाताच गोन्झालेझ गोंधळला. आता कुलूप फोडण्याशिवाय त्याला गत्यतर नव्हते. कोणी वरती येत नाही हे पाहण्यासाठी स्टर्जिस जिन्यापाशी उभा होता. बाकरे आणि मार्टिनेझ आपल्या खोलीत बसून मॅक्कॉर्डच्या आदेशाची वाट पहात होते. हट आणि लिडी याचा मुक्कामही त्यावेळी वॉटरगेट हॉटेलमध्येच होता.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या कचेरीचे दार उघडल्याचे गोन्झालेझने कळविताच मार्टिनेझ आणि बार्कर तेथे येऊन पोहोचले.

यावेळेपर्यंत विल्स कॉफी पिऊन परतला होता. तळमजल्यावरच्या गॅरेजला दाराला मघाशी जसे टेप लावलेले आढळून आलेले होते तसेच टेप पुन्हा दिसल्यामुळे, हॉटेलमध्ये चोर शिरले असल्याचा त्याला सशय आला आणि म्हणून त्याने पोलिसांना फोन केला.

दहा–एक मिनिटात आठव्या मजल्यावरचे दिवे लागल्याचे पाहताच, समोरच्या हॉटेलात बसलेल्या बाल्डविनने वॉकीटॉकीवरून बार्करला सागितले, 'कोणीतरी आलेले दिसत आहे.'

बार्करने बेफिकिरीच्या स्वरात उत्तर दिले 'पहारेकरी असेल. दोन वाजले आहेत. यावेळी इथे दुसरे कोण येणार?'

पोलीस खालच्या मजल्यावर आले. सहाव्या मजल्यावर टेप दिसताच त्याचा सशय बळावला.

हे सारे बल्डाविन पहात होता. सहाव्या मजल्यावर वावरणारी माणसे आपल्या टोळीतील आहेत की दुसरे कोणी तेथे येऊन पोहोचले आहे हे त्याला एवढ्या अतरावरून कळेना. म्हणून त्याने वॉटरगेट हॉटेलातील एका खोलीत बसलेल्या हटला वॉकीटॉकीवरून विचारले, 'आपली माणसे सुटात आहेत की त्याचा साधाच पोशाख आहे?'

हंटला या प्रश्नाचा अर्थच समजेना. त्याने विचारले, 'काय?'

हट उत्तरला, 'आपली सारी माणसे सूट घालून वरती गेली आहेत.'

'अरे बापरे, मग भलतीच आफत आली आहे.'

'का रे?'

'सहाव्या मजल्यावर साध्या वेषातील माणसे हिंडताना मला दिसताहेत. त्याच्याजवळ रायफलीही आहेत. ते इकडे तिकडे हिंडताहेत. मला वाटते, आपली माणसे त्याना दिसणार नाहीत.'

हंटने वॉकीटॉकीवरून बार्करशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण बॅटऱ्या वाचविण्यासाठी बार्करने वॉकीटॉकी बद करून ठेवली होती. त्यामुळे हटला बार्करकडून काहीच उत्तर येईना. मॅक्कॉर्ड ओब्रायनचा फोन हाताळीत होता. पोलिसाना काचेच्या पार्टिशन आडून फक्त एकच हात दिसला. लागलीच पोलीस ओरडले, 'थाब. कोण आहे तो? बाहेर ये.'

काही क्षण गेले आणि पोलिसाना दहा हात दिसू लागले.

मॅक्कॉर्डने विचारले, 'तुम्ही कोण आहात?'

'पोलीस.'

पाचजण निमूटपणे बाहेर आले.


वॉकीटॉकीवरून बार्करशी बोलता येत नाही हे पाहून हटने बाल्डविनला कळविले, 'तू तिथेच थाब. मी आणि लिडी तुझ्याकडेच येतो.'

बाल्डविनच्या खोलीतून हटने रस्त्यावर पाहिले–आपले पाच सहकारी हातात बेड्या घालून पोलीस पहाऱ्यात नजीकच्या चौकीवर नेले जात होते.

हटला आता तेथे थाबून चालण्यासारखे नव्हते. तो तडक आपल्या घरी गेला.

विमेदारांच्या हितासाठी

# आपला वारस नेमलेला असला



## तर विम्याची रक्कम त्वरित मिळू शकते.

विमेदार मरण पावला तर त्याच्या विम्याची रक्कम कोणाला मिळते? वारस म्हणून ज्याचे नांव नोंदले असेल त्याला! तुम्ही तुमच्या पॉलिसीवर वारसाची नेमणूक केली नसेल तर अजूनही उशीर झालेला नाही आयुर्विमा महामंडळाच्या कोणत्याही कचेरीतून नॉमिनेशन फॉर्म घ्या तुमच्या पश्चात विम्याची रक्कम पत्नी, मूल किंवा कुटुंबातील दुसरी एखादी व्यक्ती, यापैकी ज्या कुणाला मिळावी अशी तुमची इच्छा असेल त्या व्यक्तीच्या नांवे तो फॉर्म भरून आयुर्विमा महामंडळाकडे लागलीच पाठवून द्या. तसेच वारसाला पॉलिसीची कल्पना द्या.

विम्याची रक्कम लौकर मिळण्यासाठी तुम्हाला इतरही काळजी घेता येईल. त्यासाठी वयाचा दाखला सादर करून तुमचे वय मान्य करून घ्या. पत्ता बदलला असल्यास आयुर्विमा महामंडळाला नवीन पत्ता कळवा. विमाहप्ता वेळच्यावेळी आणि योग्य कचेरीत भरा.

ज्या एजंटामार्फत तुम्ही विमा उतरला आहे त्याची मदत घेऊन आपली पॉलिसी व्यवस्थित चालू असल्याची खात्री करून घ्या. जरूर तर आयुर्विमा महामंडळाच्या नजिकच्या कचेरीशी संपर्क साधा.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

RADEUS/LIC/AS-1

सकाळी आठ वाजता 'वॉशिंग्टन पोस्ट'चा कार्यकारी संपादक हॉवर्ड सिमन्स याला घरी फोन आला, 'डेमोक्रॅटिक पक्षाच्या वॉटरगेट इमारतीमधल्या कचेरीत चोरी झाली आहे.'

त्याने लगेच त्या पत्राची सचालिका कॅथरिन ग्रॅहम आणि आपला मदतनीस हॅरी रोसेनफिल्ड यांना फोन करून ही बातमी सांगितली. रोसेनफिल्डने बॅरी सुममानला बोलावून घेऊन या घरफोडीची माहिती गोळा करण्यासबधी आवश्यक ती व्यवस्था करायला सांगितले सुसमानने लागलीच लेविसला वॉटरगेटकडे धाडले. रात्री पकडलेल्या पाच आरोपींना लवकरच न्यायालयापुढे उभे करण्यात येणार असल्याचे कळल्यामुळे सुसमानने रॉबर्ट वूडवर्ड या दुसऱ्या वार्ताहराला न्यायालयातील जाबजबाबाचा तपशील मिळविण्याच्या कामगिरीवर धाडले.

न्यायाधीश जेम्स बेलसन याने मॅककॉर्डला विचारले, 'तुझे नाव काय ?'

'एडवर्ड मार्टिन.'

'व्यवसाय ?'

'सुरक्षितताविषयक सल्लागार'

'पूर्वी तू कुठे होतास ?'

'सी आय. ए मध्ये'

मॅककॉर्डप्रमाणे बर्नार्ड बार्कर, फ्रॅन्क स्टर्जिस, युजिनो मार्टिनेझ आणि व्हर्जिलिओ गोन्झालेझ यांनीही खोटी नावे सांगितली होती.

पोलिसानी डेमोक्रॅटिक पक्षाच्या कचेरीत या आरोपींना पकडले तेव्हा त्याच्याजवळ वॉकीटॉकी, कॅमेरा, रेडियो, रिसीव्हर ही उपकरणे आणि पाच हजार डॉलर्सच्या नोटा सापडल्या होत्या. या आरोपीसबधीचे पूर्ववृत्त कार्ल बर्नस्टेन या 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या दुसऱ्या वार्ताहराने पैदा केले.

दुसऱ्या दिवशी वॉशिंग्टनमधील जिल्हा न्यायालयात या पाच जणावर खटला दाखल करण्यात आला. तीस हजार ते पन्नास हजार डॉलर्सच्या जामिनावर आरोपींना सोडण्यात आले.

'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अठरा जूनच्या अकात 'वॉटरगेट' घरफोडीची बातमी प्रसिद्ध झाली तेव्हा एक फार मोठा खळबळजनक कट लवकरच उघडकीस येणार आहे याची कोणालाच कल्पना नव्हती.

बॉब वूडवर्ड आणि कार्ल बर्नस्टेन हे 'पोस्ट'चे दोन वार्ताहर या कामासाठी नियुक्त करण्यात आले

पुढे हट आणि लिडी यानाही या खटल्यात आरोपी म्हणून दाखल करण्यात आल्यावर खटल्याच्या काळात हे सातजण 'वॉटरगेट-सप्तक' म्हणून सबोधिले जाऊ लागले.

बार्कर आणि इतर चौघेजण पकडण्यात आल्याचे कळताच हट आणि लिडी मोठ्या काळजीत पडले. हे प्रकरण कदाचित आपल्यावरही शेकणार याचा त्याना अदाज आला होता. हटने जोसेफ राफर्टीला आपले वकीलपत्र दिले तर लिडीने त्यावेळी लॉस एजेलिस येथे असलेल्या मॅग्रुडर आणि मिचेल याना फोन केला

मॅग्रुडरने रिसीव्हर हातात घेताच, भेदरलेल्या लिडीचा आवाज त्याने ओळखला. त्याने विचारले, 'काय झालय ?'

'मोठाच घोटाळा झालाय !'

'कोणता ?'

'मॅककॉर्डला वॉटरगेटमध्ये पकडण्यात आलंय !'

'बरं, आणखी काय काय झालय ?'

'पाच जणांना काल रात्री पकडले. या व्यतिरिक्त मलाही अजून काही कळलेले नाही,' एवढे सागून लिडीने फोन खाली ठेवला.

मॅग्रुडरने लारूए याला लिडीने सांगितलेली बातमी कथन केली. लारूएने ती बातमी जॉन मिचेलला सांगितली तेव्हा तो म्हणाला, 'हे घडण अशक्य आहे.'

मॅग्रुडर, लारूए आणि मिचेल या बातमीच्या सभाव्यतेसबधी चर्चा करीत असतानाच, 'वॉशिंग्टन पोस्ट'चा अक त्याच्या हातात पडला.

### क्रीपचा खुलासा

मिचेलने ॲटर्नी जनरलपदाचे त्यागपत्र देऊन, 'क्रीप'चे प्रमुखपद स्वीकारले असल्याचे सर्वांना माहीत असल्यामुळे लॉस एजेलिसमधील वार्ताहर त्याची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्याला भेटले. मिचेल सांगू लागला, 'मॅककॉर्ड हा खासगी डिटेक्टिव्ह आहे. आम्ही आमची काही कामे त्याच्याकडे सोपवितो हे खरे आहे. परतु तो काही आमच्या एकट्याचाच नोकर नाही. इतरही त्याची अनेक गिऱ्हाइके आहेत. ते काहीही असो, मॅककॉर्डने नुकतेच जे काही केले ते आमच्या समतीने वा आमच्यासाठी केलेले नाही एवढे मी निश्चित सागू इच्छितो. कारण आमच्या प्रचारमोहिमेमध्ये असल्या हीन प्रकाराना मुळीच स्थान नसते, आणि समजा, आमच्यासाठी कोणी असा प्रकार केला तर तो आम्ही कधीही सहन करणार नाही.'

'क्रीप'च्या सचालकाने असा तातडीने खुलासा केला तरी डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष लॅरी ओब्रायन याचा त्यावर विश्वास बसला नाही. तो म्हणाला, 'वॉटरगेट प्रकरणामागे निक्सन याच्या प्रचारासाठी स्थापन झालेल्या समितीचा हात नाही या मिचेलच्या स्पष्टीकरणावर विश्वास ठेवणे मला अशक्य आहे.'

तरीही वॉटरगेट प्रकरण थेट अध्यक्ष निक्सन याच्यापर्यंत जाऊन भिडेल असे त्यावेळी कोणालाही वाटले नाही.

पोलिसाचे शोधकार्य सुरू झाल्यावर त्याना पहिला सुगावा लागला तो बार्करपाशी सापडलेल्या वहीमुळे. त्या वहीत काही पत्ते लिहिले होते. एके ठिकाणी 'एच. एच.' असा उल्लेख होता. त्यावरून बार्कर हॉवर्ड हटशी परिचित असला पाहिजे असे पोलिसांनी ताडले आणि त्यानी तडक हटचे घर गाठले.

निर्विकार चेहरा करीत हटने विचारले, 'काय काम आहे ?'

'आपल्याला काही विचारायचय.'

'मला जे काही सागायचे असेल ते मी आपल्या वकिलाच्या उपस्थितीत सागेन. मी आपल्या वकिलाला घेऊन तुमच्या कचेरीत येतो.'

बार्करच्या वहीत 'डब्ल्यू. एच.' असाही उल्लेख होता. त्यावरून 'श्वेतभवना'शी हे प्रकरण निगडीत असणार हे गुप्तचर खात्याने ताडले आणि म्हणून पॅट्रिक बॉग्ज आणि जॉन कॉलफिल्ड यानी एलिचमानची भेट घेतली. बॉग्जने सांगितले, 'बार्करच्या झडतीत जी वही सापडली त्यात हट आणि श्वेतभवन याचा उल्लेख आहे. त्यामुळे आपल्याला या बाबतीत काय माहिती आहे हे आम्ही

विचारायला आलेले आहोत.'

कॉलफिल्ड एलिचमानला म्हणाला, 'हे प्रकरण सुरुवातीला जेवढे वाटत होते त्यापेक्षाही अधिक गभीर आहे असे आता आम्हाला वाटू लागले आहे.'

एलिचमान उत्तरला, 'तुमच्या या अदाजावर माझा विश्वास बसत नाही. तरीही मी मिचेलशी बोलतो.'

त्याप्रमाणे एलिचमानने मिचेलला फोन केला. मिचेल म्हणाला, 'मला यातील काहीही माहीत नाही. काही कळले तर मी तुला नतर कळवितो.'

निक्सन नुकतेच मास्कोच्या दौऱ्यावरून आलेले असल्यामुळे ते की बिस्केने येथे विश्राती घेत होते. त्यामुळे त्यांचा प्रसिद्धी-सचिव रॉन झेग्लेरचा मुक्कामही तेथेच होता. त्यामुळे एलिचमानने की बिस्केन येथे फोन करून झेग्लेरशी सपर्क साधला. एलिचमानने चक कोल्सनलाही फोन केला होता.

एकीकडे एफ बी. आय. ची यत्रणा वॉटरगेट-प्रकरणामागचे खरे सूत्रधार शोधण्यासाठी सतत धावपळ करीत होती तर 'क्रीप'चे पदाधिकारी या घटनेशी श्वेतभवनाचा काहीही सबध नाही हे सिद्ध करण्यासाठी खटाटोप करीत होते. त्यावेळी त्याचा एकच उद्देश होता— वॉटरगेटशी अध्यक्ष निक्सन याचा सबंध जोडला जाता कामा नये.

परंतु हे प्रकरण दडपले जाणार नव्हते.

शेवटी २९ ऑगस्टला निक्सननी जाहीर केले—'माझा कायदा-विषयक सल्लागार जॉन डीन याने या प्रकरणाची चौकशी केली असून त्यावरून माझी अशी खात्री पटली आहे की, वॉटरगेट प्रकरणाशी श्वेतभवनातील अधिकाऱ्यांचा वा माझ्या प्रशासकीय सहकाऱ्यांचा मुळीच सबध नाही.'

अध्यक्षांच्या या निवेदनावर 'वॉशिग्टन पोस्ट'ने विश्वास ठेवला नाही. उलट आपल्या १० ऑक्टोबरच्या अकात 'पोस्ट'ने लिहिले—

'डेमोक्रॅटिक पक्षाची वॉटरगेटमधील कचेरी फोडण्यामागे निश्चतचपणे राजकीय कारस्थानच होते आणि त्यामध्ये निक्सन याच्या फेरनिवडणुकीसाठी स्थापन झालेल्या समितीचा आणि श्वेतभवनातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग आहे.'

या बातमीत हाल्डेमान, सेग्रिटी, चॅपिन आणि कामबाच यांचा उल्लेख करण्यात आलेला होता, आणि तरीही हे सारे महाभाग आपल्या कानावर हात ठेवून बसले होते.

'वॉशिग्टन पोस्ट'मध्ये ही बातमी प्रसिद्ध झाली तेव्हा राष्ट्राध्यक्ष-पदाची निवडणूक एक महिन्यावर येऊन ठेपली होती.

त्यामुळे 'क्रीप'च्या आणि श्वेतभवनाच्या इन्कारांना जोर चढला. 'क्रीप'च्या आर्थिक समितीचा अध्यक्ष मॉरिस स्टान्सने खुलासा केला, 'वॉशिग्टन पोस्टने 'क्रीप'वर केलेला आरोप म्हणजे धादात खोटे-पणाचा कळस म्हटला पाहिजे.' क्लार्क मॅकग्रेगॉर यानेही स्टान्स-चीच री ओढली.

'क्रीप'चा संचालक जॉन मिचेल याने तर कहरच केला. त्याची मुलाखत घेण्यासाठी आलेल्या 'वॉशिग्टन पोस्ट'च्या वार्ताहराला त्याने सागितले, "तुमची मालकीण कॅथेरिन ग्रॅहम हिच्यावरच तुम्ही लोकानी पाळत ठेवली पाहिजे. कारण लवकरच ती एका मोठ्या प्रकरणामध्ये अडकल्याचे तुम्हाला ऐकायला मिळेल.'

'वॉशिग्टन पोस्ट' आपल्या वार्ताहरांकरवी मिळालेल्या बातम्या प्रसिद्ध करू लागले तसतशी निक्सन याची मेहेरबानी सपादन करायला ही चांगली सधी प्राप्त झाली आहे असे मानणाऱ्या मडळीनी एकच गदारोळ माजविला— 'राष्ट्राध्यक्षाना बदनाम करण्यासाठी मुद्दामच हितसबधी मडळीकडून आघाडी उघडली गेली असून तिच्यामागे परदेशी सस्थाचा हात असला पाहिजे.'

रॉन झेग्लेरने जाहीर केले—'हाल्डेमानसारख्या सद्गृहस्थाचा वॉटरगेटशी सबध जोडण्यामागे निव्वळ चारित्र्यहननाचा कावा आहे आम्हाला स्वतत्र बाण्याच्या अमेरिकन वृत्तपत्रीय परपरेचा रास्त अभिमान आहे. परतु 'वॉशिग्टन पोस्ट'ने सुरू केलेली मोहीम मात्र घाणेरड्या वृत्तपत्रीय नीतीचा नमुना आहे.'

'वॉशिग्टन पोस्ट'ला चोख उत्तर देण्यासाठी कोणता पवित्रा घेतला पाहिजे याचा विचार करण्यासाठी १५ ऑक्टोबरला श्वेत-भवनातील रूझवेल्ट सभागृहात बैठक भरली. रॉन झेग्लेर, जॉन एलिचमान, पॅट्रिक बुचनान, रिचर्ड मूर, ड्वाईट चॅपिन, जॉन डीन आणि फ्रेड फेल्डिंग अशी निक्सन परिवारातील मडळी झेग्लेरला वार्ताहराकडून कोणकोणते प्रश्न विचारले जातील आणि झेग्लेरने ते कसे परतवून लावावेत याचा विचार करू लागली. एवढे पाठबळ लाभल्यामुळे चेकाळलेल्या झेग्लेरने वार्ताहराना सागितले, 'मी पुन्हा एकदा जाहीर करतो की वॉटरगेटमधील हेरगिरीमागे श्वेतभवनातील कोणाचाही हात नाही.'

## 'पोस्ट'चा एकाकी लढा

या खुलाशामुळे 'वॉशिग्टन पोस्ट'वर मोठीच जबाबदारी येऊन पडली. कारण वॉटरगेट प्रकरणाचा छडा लावण्याचे कार्य त्या एकाच वृत्तपत्राने मोठ्या जिद्दीने हाती घेतले होते. अनेक दडपणाना बळी न पडता, अनेक धोके पत्करून बॉब वूडवर्ड आणि कार्ल बर्नस्टेन हे वार्ताहर वॉटरगेट प्रकरण श्वेतभवनाशी निगडीत असल्याचा एकेक पुरावा मिळवीत होते. पण 'न्यूयॉर्क टाईम्स' आणि 'लॉस एजेलिस टाईम्स' ही अन्य मातब्बर वृत्तपत्रे त्यामानाने शात होती, उदासीन होती. एखाद दुसरी बातमी त्या वृत्तपत्रात प्रसिद्ध होत होती, नाही असे नाही. पण एका राजकीय भ्रष्टाचाराला उजेडात आणण्यासाठी आपणही पुढाकार घ्यावा असे त्यांना वाटले नाही. पुढे वॉटरगेट प्रकरण सेनेटच्या चौकशीपुढे गेल्यावर त्या चौकशीचा सनसनाटी वृत्तान्त द्यायला अनेक अमेरिकन वृत्तपत्रे पुढे आली आणि या 'भ्रष्टाचारविरोधी लढ्या'त आपणही सहभागी झालेले होतो अशी त्यांनी प्रौढी मिरविली. पण ते खरे नव्हते.

वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्यासाठी निक्सन आपले सामर्थ्य पणास लावीत असताना, एकट्या 'वॉशिग्टन पोस्ट'चा बुलद आवाजच खबीरपणे निनादत होता.

कॅथेरिन ग्रॅहम या 'पोस्ट'च्या सचालिकेचीही कमाल अशी की सारी शासकीय यत्रणा तिच्याविरुद्ध उभी ठाकलेली असतानाही, तिने आपल्या वार्ताहराना नियोजित कार्य थाबविण्याची एकदाही सूचना केली नाही. क्वचित, आपण जे प्रसिद्ध करीत आहोत ते खोटे तर ठरणार नाही ना असा एकाकी पडल्यामुळे सभ्रम निर्माण व्हावा अशी 'पोस्ट'ची अवस्था झाली होती. पण सत्यतेचा प्रत्यय आला की हा सशय कोठल्या कोठे विरघळून जायचा आणि पुन्हा नव्या

उमेदीने ' पोस्ट ' वॉटरगेट प्रकरणाचा आणखी तपशील प्रसिद्ध करी.

वॉशिंग्टनमध्ये निरनिराळ्या वृत्तपत्राचे बावीसशे वार्ताहर असतात. त्यापैकी अवघे चौदा जणच काय ते वॉटरगेट प्रकरणाचे मिळतील तेवढे धागेदोरे जमवीत होते. त्यातही पुढाकार होता तो बॉब वूडवर्ड आणि कार्ल बर्नस्टेन या ' पोस्ट 'च्या वार्ताहराचाच.

एक सर्वसत्ताधीश विरुद्ध एक वृत्तपत्र असा तो अभूतपूर्व सामना होता.

या कालखडाबद्दल लिहिताना कॅथेरिन ग्रॅहम यानी म्हटले आहे– ' श्वेतभवनाचा सताप अनुभवण्याचा ' वॉशिग्टन पोस्ट 'च्या आयुष्यातील हा काही पहिला प्रसग नव्हता. परतु यावेळेला श्वेतभवनातून आमच्यासंबंधी जेवढा उग्र सताप व्यक्त केला जात होता तो मात्र खरोखर भयानक होता. '

' वॉशिग्टन पोस्ट ' आपले ऐतिहासिक कार्य मोठ्या धैर्याने पार पाडीत असले तरी त्यामुळे अमेरिकन मतदारांचा निक्सन यांच्यावरील विश्वास किंचितही कमी झाला नाही उलट ते ' पोस्ट 'लाच दोष देऊ लागले. लोक म्हणायचे, ' वॉटरगेट प्रकरण खरे असते तर इतर वृत्तपत्रानीही त्याचा पाठपुरावा केला नसता का ? ज्याअर्थी एकटे 'पोस्ट 'च निक्सन याच्याविरुद्ध लिहीत आहे त्याअर्थी ' पोस्ट 'च्या हेतूसबधीच आम्हाला सशय येऊ लागला आहे. '

' वॉशिग्टन पोस्ट ' हे दैनिक निक्सन प्रशासनाने तयार केलेल्या ' शत्रू 'च्या यादीत अगोदरच जाऊन पडले होते. आता तर ते पहिल्या क्रमाकांचा शत्रू ठरले. असा हा ' शत्रू ' एकाकी पडल्यामुळे निक्सन प्रशासनाचे मानकरी खूश होते. ' पोस्ट 'वरचा वाचकाचा उरलासुरला विश्वासही नाहीसा व्हावा म्हणून निक्सन प्रशासनाने अनेक खटपटी-लटपटी केल्या.

तरीही ' वॉशिग्टन पोस्ट 'चा स्वत वरचा आणि हाती घेतलेल्या कार्याच्या हेतुवरचा विश्वास ढळला नाही, प्रयत्नात ढिलाई येऊ दिली नाही.

निक्सन याच्यासारखा उद्दाम स्वभावाचा राजकारणी, वृत्तपत्राना ' उपद्रव-शक्ती 'पेक्षा अधिक किंमत देत नव्हता. त्यामुळे वृत्तपत्र-प्रतिनिधीना भेटणे हा त्यांच्या दृष्टीने केवळ न टाळता येण्याजोगा एक उपचार होता रूझवेल्ट याच्यापासून जॉन्सन याच्यापर्यंतच्या राष्ट्राध्यक्षानी वृत्तपत्र-प्रतिनिधीना वर्षातून साधारणतः चोवीस ते छत्तीस वेळा मुलाखती दिल्या होत्या तर १९६९ ते १९७२ या आपल्या पहिल्या कारकिर्दीच्या चार वर्षांच्या कालखडात निक्सनने वर्षातून जास्तीत जास्त सात वेळा वृत्तपत्र-प्रतिनिधींची भेट घेतली.

इतर वृत्तपत्रानी ' वॉशिग्टन पोस्ट 'चे अनुकरण करू नये यासाठी निक्सन-प्रशासनामार्फत त्याच्यावर या काळात इतकी दडपणे आणण्यात आली की अमेरिकेतील वृत्तपत्र-स्वातत्र्य धोक्यात आले आहे अशी काही जणानी स्पष्ट प्रतिक्रिया व्यक्त केली. एकाने तर प्रश्न विचारला, ' निक्सन प्रशासनाच्या कारवाया पाहाता, वृत्तपत्रस्वातत्र्य उरले आहे कोठे ? त्याचा केव्हाच लोप झाला आहे. '

अपवाद होता तो फक्त ' वॉशिग्टन पोस्ट 'चा.

निक्सन याच्याविरुद्ध जनमत तयार करण्यासाठी आपल्याला वॉटरगेट प्रकरणाचा भरपूर फायदा होईल या विचाराने डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार मॅकगव्हर्न आपल्या प्रचारसभातून वॉटरगेटचा उल्लेख करू लागले. परतु गमतीची गोष्ट अशी की एकटे ' वॉशिग्टन पोस्ट 'च या प्रकरणासबधी लिहीत असल्यामुळे, मॅकगव्हर्न याच्या सभाना येणाऱ्या श्रोत्यापैकी निम्म्याहून अधिक श्रोत्यांनी वॉटरगेट हा शब्ददेखील पूर्वी ऐकला नव्हता. ज्या लोकांना थोडीफार माहिती होती त्यानादेखील मॅकगव्हर्न याना वॉटरगेट प्रकरण आक्षेपार्ह का वाटावे याचा बोध होत नव्हता.

निक्सन याच्याशी झुज घेण्याइतके सामर्थ्य मॅकगव्हर्न याच्यापाशी नाही हे अगोदरच दिसून आले होते. त्याची उमेदवारी पत्करणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्षालाही मरगळ आलेली होती. तरीही निक्सन यांना धोका पत्करायचा नव्हता. त्यामुळे निवडणुकीला अवघे बारा दिवस राहिलेले असताना, व्हिएटनाममधील शातता दृष्टिपथात आल्याचे हेन्री किसिंजर यानी जाहीर केले. त्यामुळे तर मॅकगव्हर्न याची उरली-सुरली आशाही विझून गेली.

पुढे उत्तर व्हिएटनामी प्रतिनिधीशी किसिंजर यांनी आरभिलेल्या वाटाघाटी मोडल्या आणि हॅनॉय-हैफाँगवर जोरदार बॉबवृष्टी करण्याचा निक्सनने आपल्या विमानदलाला आदेश दिला. नतर काही दिवसानी पॅरिस येथे उत्तर व्हिएटनामी प्रतिनिधीशी किसिंजर यानी करार केला, आणि निक्सनने मोठ्या दिमाखात जाहीर केले– ' आग्नेय आशियामध्ये सन्माननीय शातता प्रस्थापित करण्याच्या कार्यात माझ्या प्रशासनाला यश आले आहे. ' पण ते सर्वस्वी खरे नव्हते. अमेरिकन विमानाची कबोडियात बॉबफेक चालू होतीच. त्यामुळे निक्सन खोटे बोलत आहेत असा आरोप अमेरिकेतील युद्धविरोधी गटाने केला, पण त्याची त्याना आता किंचितही फिकीर नव्हती.

कारण तत्पूर्वीच निवडणूक पार पडली होती आणि साठ टक्के मते मिळवून निक्सन अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदावर पुनश्च विराजमान झाले होते.

निक्सन याना ४,७१,६७,३१९ मते मिळाली तर मॅकगव्हर्न याच्या मताची सख्या २,९१,६८,५०९ होती शिवाय पन्नास राज्यापैकी एकोणपन्नास राज्यात निक्सनना निर्विवाद बहुमत मिळाले होते. एवढा प्रचड विजय अलीकडच्या काळात दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राध्यक्षाने मिळविला नव्हता.

निक्सन याच्या जयजयकाराच्या कल्लोळात वॉटरगेटचे नाव कोठल्या कोठे बुडून गेले !

### ते सात आरोपी

निक्सन निवडून आल्यामुळे ' क्रीप 'ने आपले उद्दिष्ट साध्य केले होते. परतु तरीही ' क्रीप 'ची अस्वस्थता कमी झाली नव्हती वॉटरगेट प्रकरणामध्ये अडकलेल्या सात आरोपीचा आवाज बद पाडण्यासाठी त्याना भरपूर पैसे देण्याची गरज आहे हे जॉन डीनला माहीत होते. त्यासाठी त्याने मिचेल, लारुए आणि मार्डिआन यांना बोलावून घेऊन सागितले, ' वॉटरगेट खटला लवकरच सुरू होईल त्यावेळी सर्वच आरोपी निमूटपणाने आरोप मान्य करून गप्प बसतील अशी शक्यता नाही. म्हणून आपण त्यांना पैसे दिले पाहिजेत. '

डीनने हाल्डेमान आणि एर्लिचमान यांच्या सल्ल्याने योग्य ती व्यवस्था करावी असे त्या बैठकीत ठरले. त्याप्रमाणे डीन त्या

दोघाना भेटला तेव्हा त्यानी ही कामगिरी कामबाचकडे सोपविण्यास सागितले. डीनने कामबाचला फोन केला.

लॉस एंजेलिसहून विमानाने कामबाच वॉशिंग्टनला येताच, त्याच्या उतरण्याची व्यवस्था स्टॅटलर हिल्टन हॉटेलमध्ये करण्यात आली. या आलिशान हॉटेलमध्ये बडचा लोकाची सारखी वर्दळ चालू असल्यामुळे डीनने आपल्याला कोपऱ्यावरच्या छोटचाशा कॉफीगृहात भेटावे असे त्याने डीनला सुचविले. त्याप्रमाणे डीन तेथे आला. ती जागाही डीनला सोयीची वाटली नाही म्हणून तो कामबाचला म्हणाला, 'आपण लॅफाते पार्कमध्ये फिरायला जाऊ. तिथे मोकळे-पणाने बोलता येईल.'

लॅफाते पार्कच्या हिरवळीवर हिंडता हिंडता, डीन कामबाचला सागू लागला, 'वॉटरगेट खटल्यामध्ये अडकलेल्या सातजणाना पैसे देण्यासाठी निधी जमवावा लागेल. या कामात तू कुशल आहेस म्हणून तुझ्याकडे मी ही जबाबदारी सोपवीत आहे.'

कामबाचने विचारले, 'किती पैसे लागतील ?'

'पन्नास हजार ते एक लाख डॉलर्स. रकमेचा प्रश्न तसा अवघड नाही. पण हे काम अतिशय गुप्तपणे आणि तातडीने झाले पाहिजे.'

हॉटेलवर परतल्यावर कामबाचने 'क्रीप'च्या आर्थिक समितीचा अध्यक्ष मॉरिस स्टान्स याला निरोप धाडला कामबाचला कशासाठी पैसे हवे आहेत हे माहीत असल्यामुळे पचाहत्तर हजार डॉलर्सच्या नोटा घेऊन स्टान्सची स्वारी कामबाचच्या खोलीत आली. स्टान्सला पाहताच कामबाचची काळजी दूर झाली. कारण त्याला किमान पन्नास हजार डॉलर्स हवे होते तर स्टान्सने त्याच्या हाती पचाहत्तर हजार डॉलर्स सुपूर्द केले होते.

स्टान्सने अल्पावधीत एवढी मोठी रक्कम कोठून पैदा केली हे कधीच उजेडात आले नाही. वॉटरगेट प्रकरणातील इतर अनेक रहस्याप्रमाणे हे रहस्यही अनाकलनीयच राहिले.

लारुए याने कामबाचला, हे पैसे कोणाला, कशारीतीने द्यायचे हे समजावून सागितले. हा सारा व्यवहार कमालीचा गुप्त ठेवणे अपरिहार्य असल्यामुळे कोणीही आपल्या खऱ्या नावाचा उच्चार करायचा नाही आणि खाजगी टेलिफोनऐवजी सार्वजनिक टेलिफोन करायचा असे ठरले. लारुए आणि कामबाच परस्पराना 'ब्रॅडफोर्ड' या एकाच नावाने सबोधणार होते तर कामबाचचा मदतनीस उलासेविझ याचे मिस्टर नोवॉक असे नामकरण करण्यात आले. उलासेविझ कामबाचचा संपर्क साधताना त्याची चौकशी मिस्टर रीव्हर्स या नावाने करणार होता. स्टान्सने घोव्याच्या पिशवीतून ही रक्कम आणलेली असल्यामुळे तिला 'लॉण्ड्री' हे सांकेतिक नाव देण्यात आले.

आरोपीना पैसे द्यायचे तर ते त्याच्या वकिलामार्फत देणे योग्य ठरेल या विचाराने उलासेविझ अनेक वकिलाना भेटून त्यांचा अदाज घेऊ लागला पण वॉशिंग्टनमध्ये त्याला कोणी थारा देईना. म्हणून 'लॉण्ड्री' घेऊन न्यूयॉर्कला जाण्यासाठी उलासेविझ विमानतळावर आला. पाहातो तो तपासणी अधिकारी प्रवाशांच्या रोखाने येताना दिसला. उलासेविझ तेथून लगबगीने निघाला आणि टॅक्सी करून त्याने तडक स्टेशन गाठले आगगाडीने तो न्यूयॉर्कला आला

वॉटरगेट प्रकरणात अडकल्यापासून हटची पैशाची मागणी बरीच वाढली आहे हे उलासेविझला माहीत नसले तरी विल्यम ओ. बिटमन या हटच्या वकिलाला ठाऊक होते. पैसे मिळविण्याची ही सधी स्वतः बिटमनही दवडणार नव्हता. उलासेविझ भेटायला येताच तो म्हणाला, 'माझी फी पंचवीस हजार डॉलर्स आहे ह'

बिटमन काम करायला तयार आहे हे कळल्यामुळे उलासे विझने त्याच्याशी घासाघीस केली नाही. नतर त्याने हटच्या बायकोला फोन करून विशिष्ट ठिकाणी ठेवलेले पैसे घेऊन जायला सागितले. हटच्या बायकोने घरी आल्यावर पैसे मोजले आणि उलासे विझला निरोप धाडला,

'चाळीस हजार डॉलर्स पुरणार नाहीत.'

'का ?'

'मी सगळचा आरोपीना भेटले आहे कमी पैशात गप्प बसायला ते मुळीच राजी नाहीत. त्याच्या वकिलानाच एक लाख तीस हजार डॉलर्स द्यायचे आहेत.'

'कसे काय ?'

'हंट लिडी, मॅककॉर्ड आणि बार्कर याच्या वतीने प्रत्येकी पचवीस हजार आणि स्टर्जिस, गोन्झालेझ व मार्टिनेझ याच्या वतीने प्रत्येकी दहा हजार. शिवाय या सात जणाना स्वतच्या खर्चासाठी पैसे लागतील ते वेगळेच.'

'ते किती ?'

'एकोणसाठ हजार डॉलर्स.'

उलासेविझ न्यूयॉर्कहून वॉशिंग्टनला परतला आणि हटच्या बायकोशी झालेले बोलणे त्याने कामबाचच्या कानावर घातले. हटबाईला नकार देऊन चालण्यासारखे नव्हते. कामबाच 'क्रीप'-कडून पैसे आणीत होता आणि उलासेविझ ती रक्कम हटबाईच्या स्वाधीन करीत होता. उलासेविझमार्फत वाटली गेलेली रक्कम लवकरच साडेचार लाख डॉलर्सच्या घरात गेली. तरीही हटबाईचे समाधान होईना. शेवटी कामबाच कटाळला आणि त्याने डीन आणि लारुए याचा निरोप घेतला. कामबाच बाहेर पडल्यामुळे उलासे-विझनेही स्वत.ची मोकळीक करून घेतली. म्हणून सात आरोपीना देण्यासाठी पैसे गोळा करणे आणि ते योग्य ठिकाणी पोहोचते करणे हे काम फ्रेड लारूएने स्वत कडे घेतले.

'आरोप कबूल करून गप्प बसा' असा 'क्रीप'चा आरोपीच्यामागे लकडा लागला होता. परतु गुन्हा कबूल केला तर पचावन्न वर्षे


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पाढऱ्या डागावरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानतर आम्ही अनेक आडाखे बाधून पाढऱ्या डागावरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्या-वर आपणास त्याच्या गुणाची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकानी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पाढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पेछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सागा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

कारावास आणि पन्नास हजार डॉलर्स दंड ही शिक्षा भोगावी लागणार होती आणि म्हणूनच 'क्रीप'चे ऐकायला आरोपी तयार होईनात. त्यापायीच तर 'क्रीप'कडून तोंडाला येईल ती रक्कम ते वेळोवेळी मागत होते. तरीही गुन्हा कबूल करायला ते तयार होईनात. शेवटी ते म्हणाले, 'आम्ही गुन्हा कबूल करू. परतु आम्हाला शिक्षा झाल्यावर राष्ट्राध्यक्षानी आपला खास अधिकार वापरून आम्हाला माफी दिली पाहिजे.' ही मागणी करणाऱ्यात हँटने पुढाकार घेतला होता आणि इतर आरोपीनी नतर त्याचे अनुकरण केले. राष्ट्राध्यक्षांच्या वतीने तसे आश्वासन देणे 'क्रीप'च्या सूत्रधारांना शक्य नव्हते. त्यामुळे तो प्रश्न रेंगाळत पडला होता.

अखेर हा खटला वॉशिंग्टन जिल्हा न्यायालयाचे सरन्यायाधीश जॉन सिरिका याच्यापुढे उभा राहिला. त्यामुळे तर सगळे आरोपी भेदरून गेले. कारण एखाद्या आरोपीने आपल्याला खोटे उत्तर दिले आहे अशी सिरिका यांची खात्री पटली की त्याना भलती चीड येते असा त्यांचा लौकिक होता. शिवाय गुन्हेगाराला कायद्यात सांगितलेली जास्तीत जास्त शिक्षा देण्याबद्दलही ते प्रसिद्ध होते. त्यामुळेच त्यांना गमतीने 'मॅक्झिमम जॉन' म्हणण्यात येई.

सिरिका याच्यापुढे खटला उभा राहाताच पाच आरोपीनी गुन्हा कबूल केला. फक्त लिडी आणि मॅककॉर्ड यांनी आपण गुन्हेगार नसल्याचे सागितले. परतु त्या दोघावरही आरोप शाबीत झाला. खटल्याची सुनावणी पूर्ण झाली होती. आता फक्त निकाल जाहीर करायचे काम बाकी राहिले होते. जॉन सिरिका यांनी जाहीर केले की, 'मी तेवीस मार्चला निकालपत्र वाचून दाखवीन.'

वॉटरगेट प्रकरण कदाचित एवढ्यावरच मिटले असते. पण मधल्या काळात मॅककॉर्डने सिरिका यांना पत्र लिहिले होते. निकालपत्र वाचून दाखविण्यापूर्वी सिरिका यानी मॅककॉर्डचे पत्र वाचून दाखविले. त्या पत्रात मॅककॉर्डने म्हटले होते—

'डेमोक्रॅटिक पक्षाच्या वॉटरगेटमधील कचेरीत महत्त्वाच्या कागदपत्राची चोरी करणे, अन्य कागदपत्राची छायाचित्रे घेणे आणि टेलिफोनमधील सभाषण मुद्रित होईल अशी उपकरणे बसविणे या कार्यासाठी आम्हाला लाच देण्यात आली होती. आमच्यावर दबाव आणला गेला होता. या कृत्यामागे श्वेतभवनातील वरिष्ठ अधिकारी आणि 'क्रीप'चे सूत्रधार याचाच हात होता. खटला चालू असताना आम्ही ही वस्तुस्थिती आपल्याला सांगितली नाही याचे कारण असे की आम्हाला ठार मारायलाही 'क्रीप'चे लोक कमी करणार नाहीत अशी आम्हाला भीती वाटली.'

पत्र वाचून दाखविल्यावर, ज्युरीच्या आदेशानुसार सिरिकानी सात आरोपीना पधरा ते पस्तीस वर्षे मुदतीच्या शिक्षा ठोठावल्या. दडाच्या रकमाही वेगवेगळ्या होत्या.

सिरिका यांच्यापुढील खटला सपला आणि १७ जून १९७२ च्या रात्री घडलेल्या एका प्रकरणावर पडदा पडला. वॉटरगेट प्रकरणातील सात आरोपी आपापल्या शिक्षा भोगण्यासाठी तुरुगाच्या भिंतीआड कोंडले गेले.

पण मॅककॉर्डच्या पत्राने एक भीषण सत्य जाहीर केले होते आणि ते कोणालाही दडपून टाकता येणार नव्हते मॅककॉर्डने श्वेतभवनाचा उल्लेख केला होता आणि त्यामुळे राष्ट्राध्यक्षाना जाब द्यावा लागणार होता.

डेमोक्रॅटिक पक्षाचा सेनेटर माईक मॅन्सफील्ड याने सेनेटमध्ये ठराव माडला—'वॉटरगेट प्रकरण हा साध्या गुन्हेगारीचा प्रकार नसून कायदा धाब्यावर बसवून, राजकीय हेरगिरी करण्यासाठी आखलेला एक मोठा प्रयत्न होता आणि म्हणून हे प्रकरण आता सेनेटपुढे चौकशीसाठी आले पाहिजे.'

सेनेटर एर्विनच्या अध्यक्षतेखाली 'वॉटरगेट चौकशी समिती' स्थापन झाली.

येथपासून वॉटरगेट प्रकरणाला अधिक गाभीर्य प्राप्त झाले.

परतु तरीही सत्य उजेडात येणार नाही यासाठी खटाटोप करायला निक्सन यांना सकोच वाटला नाही.

निक्सन विरुद्ध वॉशिंग्टन पोस्ट हा लढा सपला होता. आता निक्सन विरुद्ध सेनेट असा सामना सुरू होणार होता.

बेगुमान सत्ताधीशाचे अतरग लोकप्रतिनिधीसमोर उघडे होणार होते

**अपूर्ण**

---


| | | | |
|---|---|---|---|
| **पुरंदऱ्यांचा सरकारवाडा** | ब. मो. पुरंदरे | किमत सात रुपये | राजहंस प्रकाशन पुणे ३० |
| **शनवारवाड्यातील शमादान** | ब. मो. पुरंदरे | किमत साडेतीन रुपये | राजहंस प्रकाशन पुणे ३० |

दूरदृष्टीचा आंधळा

# जॉन विल्सन

डॉ. शरद अभ्यंकर

लहानपणी एक गोष्ट वाचली होती. एक प्रवासी चुकून एका दरीत येऊन पडतो. तिथे सपूर्ण आंधळ्या लोकाची वस्ती असते. आपणाला डोळे असल्यामुळे आपण या लोकाचेवर सहज राज्य करू शकू अशी त्याची कल्पना होते, पण आंधळेच शेवटी त्याच्यापेक्षा वरचढ ठरतात... अशी काहीशी ती गोष्ट होती. त्यावेळी अशा प्रकारचा सर्वच लोक आंधळे असणारा प्रदेश केवळ कविकल्पनेतच असाव। अशी सहाजिकच कल्पना झाली होती. पण उत्तर घानामध्ये खरोखर असा मोठा प्रदेश आहे त्याला नदी अंधलाचा प्रदेश म्हणतात. या नदीचे नाव आहे सिसिली. रॉयल कॉमनवेल्थ अंध सस्थेचे सचालक जॉन विल्सन या नदीच्या काठाने प्रवास करीत होते. इथली काही गावे तर मृतप्राय झाली होती. आंधळ्या आणि कृश झालेल्या स्त्रियाना पाण्याकडे जाण्याकरता एक दोरी बांधली होती. त्याला धरून धरून धडपडत त्या पाणी भरीत होत्या. एखादे दुसरे डोळे शाबूत असलेले पोरगे काठीच्या टोकाला धरून दोन दोन अंध लोकाना घेऊन जात होते. ज्या ज्या गावात जावे त्या त्या ठिकाणी हेच दृष्य दिसे. लोक सागत आमच्याकडे बहुतेक सगळे आंधळेच आहेत. खूप लोक भरतातही. कारण जमीन कसणार तरी कशी? उपाय? छे, या अंधत्वाला काही उपाय नाहीच. ही नदीच अंधत्व आणते!

या गोष्टी ऐकून विल्सनना चीड आणि संताप येत होता. कारण हा रोग (River blindness ऑंकोसेर्कियासिस) आता काही जादूटोणा समजण्याचे कारण नव्हते! नदीच्या काठाला वाढणारी एका विशिष्ट जातीची माशी (Simulium damnosum) या रोगाचे सूक्ष्म कृमी वहाते. ती चावली की हे कृमी शरीरभर वाढू लागतात. त्यातले काही डोळ्यात येऊन तिथे मरण पावतात. आणि त्यामुळे डोळ्याचे बुबुळ अपारदर्शक बनू लागते. हळू हळू माणूस पूर्ण आंधळा बनतो. एकदा अंधत्व आल्यावर अर्थात काहीही इलाज चालत नाही. त्यामुळे या माशाचा नायनाट करणे हाच मार्ग उरतो. पण इतक्या मोठ्या प्रदेशातली प्रत्येक माशी नष्ट करायची ही गोष्ट अशक्यप्रायच समजून आपण सोडून दिली असती पण विल्सनची जिद्द काही वेगळीच होती. इंग्लडला परत येऊन त्यानी या मोहिमेच्या दृष्टीने सशोधन करण्याकरता माणसे पाठवली. या प्रदेशाची सपूर्ण पहाणी करण्याकरता लागणारे १५ लाख रुपये त्यानी रेडिओवरून लोकाना आर्जवे करून मिळवले.

ही पहाणी पूर्ण व्हायला ४ वर्षे लागली. आणि वाटले होते त्यापेक्षा हा प्रश्न भलताच गभीर आढळला. रोगग्रस्त प्रदेश १३ निरनिराळ्या देशात पसरला होता. त्यामुळे केवळ एका देशात प्रतिबधक उपाय योजून उपयोग नव्हता. सुसूत्रपणे फार मोठ्या प्रमाणावर या माशाविरुद्ध मोहीम सर्व ठिकाणी सुरू करायला हवी होती. इतके सगळे कुठले जमायला म्हणून विल्सन स्वस्थ बसले नाहीत. त्यानी पुन्हा जोरदार मोहीम उभारली. या देशांची सरकारे, जागतिक आरोग्य संघटना याचा पिच्छा पुरवला. आणि आता या वर्षी जागतिक आरोग्य सघटनेच्या देखरेखी खाली, जागतिक बँकेकडून पैसे मिळवून या सर्व प्रदेशातील नद्या, ओढे, नाले आणि तलावावर या माशांच्या अळीचा नायनाट करणारी औषधे मारण्याचे ९५ कोटी रुपयाचे प्रचंड काम हाती घेण्यात आले आहे. सर्व गोष्टी सुरळीत पार पडल्या तर १९९५ पर्यंत हा भाग निर्माशीमय होईल.

नदी अंधत्वाविरुद्ध मोहीम ही विल्सन यानी चालना दिलेल्या अशा अनेक मोहिमापैकी एक आहे २४ वर्षापूर्वी त्यांनी आपली सस्था सुरू केली. या सस्थेच्या मुख्य कार्यालयात फक्त १६ कर्मचारी आहेत. पण ३५ देशातून असणाऱ्या स्थानिक सस्थाचे द्वारा कोठल्याही अंधसंस्थेने केले नसेल असे प्रचड काम ही सस्था करीत असते गरजू अंधाना तज्ञाचे सहाय्य मिळवून देणे आणि संशोधन करणे ही कामे या सस्थेतर्फे मुख्यत. केली जातात.

विल्सन स्वत: केवळ बारा वर्षाचे असताना रसायनशास्त्राच्या प्रयोगाच्या वेळी एक काचपात्र फुटून ते दोन्ही डोळ्यानी पूर्ण आंधळे झाले. पण आपले अंधत्व हे त्यानी अपगत्व कधीही मानले नाही. आपले शिक्षण त्यानी वॉरसेस्टर अंधशाळेत चालू ठेवले. तिथे नौका वल्हवण्याची शर्यत जिंकून त्यानी आपला आत्मविश्वास वाढवला. पुढे आक्सफर्ड विद्यापीठातून त्यानी कायद्याची पदवी मिळवली.

युद्धाचे वेळी तर त्यानी हवाईदलात काम मिळवण्याचा प्रयत्न केला; अर्थात त्याला यश आले नाही. पण लवकरच रॉयल नॅशनल इन्स्टिटयूट फॉर द ब्लाईंड या संस्थेत उपचिटणीस म्हणून त्याची नेमणूक झाली. या पदावर काम करणारे हे पहिले अंध गृहस्थ होत. स्वत.च्या अनुभवावरून त्यांनी हे पूर्वीच ठरवले होते की आंधळ्याच्या करता नुसत्या कार्यशाळा काढून कोणालाही नको असणाऱ्या टोपल्या त्याचेकडून बनवून घ्यायच्या हा अंधाचे प्रश्न सोडवण्याचा खरा मार्ग नव्हे. ते स्वत: एका विमान कारखान्यात काम करीत होते. त्या अनुभवाच्या आधारावर त्यांनी काही अधिकाऱ्यांच्या मदतीने २००० अंध व्यक्तीना युद्धविषयक

गेल्या वर्षी पाचगणी रोटरी क्लब तर्फे आम्ही एक नेत्र शिबिर भरवले. या शिबिराकरता अनेक व्यक्ती आणि संस्था यांची मदत झाली. त्यापैकी रॉयल कॉमनवेल्थ सोसायटी फॉर द ब्लाईंड या संस्थेने प्रत्येक मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेमागे आम्हाला एक पौंड मदतीदाखल दिला. त्यावेळी या संस्थेबद्दल फारशी माहिती नव्हती; पण नंतर या संस्थेबद्दल आणि विशेषत: त्याचे संचालक जॉन विल्सन याचेबद्दल एक लेख वाचनात आला. त्या लेखाचा हा अनुवाद.

उद्योगधंद्यात सामावून घेतले.

युद्धानतर त्यानी आफ्रिका आणि मध्य-पूर्वेमध्ये ६५,००० कि. मीटर प्रवास केला. त्याचा अहवाल पुढे सरकारतर्फे श्वेतपत्रिका म्हणून प्रसिद्ध झाला. त्या प्रवासात त्याची दोन गोष्टीबद्दल खात्री पटली. अधत्वाचे प्रमाण वाढत्या लोकसख्येबरोबर जास्तच वाढणार आहे, आणि अधत्व आलेल्याचे पुनर्वसन करण्यापेक्षा ते येऊच नये म्हणून प्रतिबधक उपाय करणे जास्त महत्त्वाचे आहे.

या दृष्टीने काम करण्यासाठी रॉयल एम्पायर सोसायटी फॉर द ब्लाईंड स्थापन करण्यात आली. (पुढे याचेच नामातर रॉयल कॉमनवेल्थ सोसायटी असे झाले.) या सस्थेची सुरुवात ३ खोल्याचे एका कार्यालयात झाली. पैसे अगदीच कमी असल्यामुळे विल्सन आणि त्याची पत्नी यानीच ऑफीसची झाडलोट करून सामान लावले. पण त्याचा आशावाद दुर्दम्य होता. 'पहिल्या वर्षी आम्ही आखलेल्या योजना पाहिल्या असत्यात तर आम्ही युनोच्या तोंडीची सस्था असलो पाहिजे असे तुम्हाला वाटले असते. प्रत्यक्षात आम्ही तिघे कर्मचारी या सस्थेत होतो.'

गेल्या मे महिन्यात अंधत्व प्रतिबधक आतरराष्ट्रीय सस्थेचे पहिले निर्वेचकीय अध्यक्ष म्हणून विल्सन याची निवड करण्यात येऊन त्यांनी आयुष्यभर केलेल्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. सस्थेच्या कामाकरता ५५ वर्षे वयाचे विल्सन हे दरवर्षी हजारो कि. मी. प्रवास करतात. या प्रवासात वावरण्याची त्यानी इतकी सवय झाली आहे की पुष्कळाना ते अध आहेत हे खरेच वाटत नाही. एकदा मात्र ते हॉटेलमध्ये चुकीच्या खोलीत शिरले. आणि पलगावर कोणाचातरी उघडा पाय हाताला लागेपर्यंत त्याच्या ते लक्षात आले नाही. तेव्हापासून आपली खोली ओळखण्याकरता ते प्लॅस्टिकचे एक लेबल दाराला चिकटवून ठेवतात. प्रकाशाकडे तोड वळवताच गुईऽ आवाज करणारा एक टॉर्च ते जवळ ठेवतात. त्याचे मुळे नवीन जागेतील खिडक्या दरवाजे त्याना समजतात. शिवाय रात्री खोलीतला दिवा चालू आहे का बद आहे तेही समजते. 'प्रथम मी अनवधानाने अधार गुडूप असणाऱ्या खोलीत भेटायला येणाऱ्या पाहुण्याना वसवीत असे' ते सागतात. मिनिटाला ८० शब्द या वेगाने ते ब्रेल लिपीत लिहू ककतात आणि मिनिटाला १०० शब्द या वेगाने ब्रेल लिपी वाचू शकतात.

विल्सन याना बागकामाची आवड आहे. (वाऱ्याने हलणारी एक घटा ते खोऱ्याला बाधून ठेवतात. त्यामुळे पुन्हा खोरे लगेच सापडते) त्यामुळे त्याना अध शेतकऱ्याच्या प्रश्नाविषयी जिव्हाळा आहे. एखादा माणूस दुर्दैवाने आधळा झाला तर त्याची प्रमुख गरज असते समाजातला एक उपयुक्त घटक म्हणून आपले स्थान टिकवण्याची. जगातील बहुसख्य लोकाचा मुख्य व्यवसाय शेती असतो, आणि म्हणूनच आधळा शेतकरी त्याच्या डोळस शेजाऱ्यापेक्षा जास्त चांगली शेती करू शकतो हे आम्ही सिद्ध करून दाखवले आहे.

२८ सलग्न राष्ट्रीय सस्थाचे मदतीने विल्सन याच्या सस्थेने विकसनशील देशातील हजारो अध शेतकऱ्याना स्पर्शाचे सहाय्याने शेती करण्यास शिकवले आहे. याना छोटया छोटया जमिनी देऊन वा त्याच्या सहकारी सस्था काढून त्याचे पुनर्वसन करण्यात येते. फक्त ७,६००रु पयात एखाद्या अंधाच्या कुटुबाला ३ हेक्टअर शेतजमीन, घर, अवजारे, बी बियाणे आणि पहिल्या वर्षाकरता प्रत्यक्ष मदत एवढी सोय केली जाते. लाब काठीला ठराविक अतरावर खाचा पाडून त्या अनुरोधाने पेरणी करण्यात येते. विशिष्ट वासाची रोपे लावल्यास इतर तण काढणे सोपे जाते.

या साऱ्या अनुभवातून विल्सन यांची खात्री पटली की अध लोकांना खास शिक्षण दिल्यास त्याना कुठलीही गोष्ट अशक्य नाही. पण इतराना हे पटावे कसे? विशेषत: आफ्रिकेतले रहिवासी आपल्या अध मुलाना शाळेत पाठवण्यास अजिबात तयार नसत. त्यातूनच विल्सन याचे पुढील कल्पक धाडस निर्माण झाले–किलिमांजारो शिखरावर अध गिर्यारोहकांची स्वारी. सस्थेचे उपसचालक जॉर्ज सॅलिसबरी यानी शिकवून तयार केलेली सात पूर्व आफ्रिकी अधाची तुकडी त्यांच्याच नेतृत्वाखाली चार दिवसाच्या खडतर मोहिमेनतर ५८९५ मीटर उचीचा किलिमाजारो शिखरावर पोचली.

या यशाची हकीगत सर्वत्र पसरताच पुढच्या वर्षी अधशाळेत प्रवेश घेणाऱ्या आफ्रिकन मुलाची सख्या २५ टक्क्यांनी वाढली.

विल्सन याच्या नेहमीपेक्षा वेगळ्या उपायांनी सस्थेपुढे असणारे काही अतिशय त्रासदायक प्रश्न सुद्धा सोडवण्यास सोपे जात असत. झांबिया आणि झेरेच्या सरहद्दीवरील काही चेटूकवाले वैदू लहान मुलाच्या डोळ्यात उपचार म्हणून झाडपाल्याची ॲसिडयुक्त औषधे टाकून त्यांना नकळत अध बनवीत असत. या वैदू लोकाची चारचौघात समावना केल्यास लोकाचा त्याच्यावरील विश्वास तर ढळणार नाहीच, उलट ते आपले पक्के शत्रू होऊन बसतील याची विल्सना खात्री होती. अशा वैदूशी त्याच्या पूर्वी बऱ्याच झटापटी झाल्या होत्या. (एकदा

तर आपला काचेचा डोळा काढून दाखवून त्यांनी एका वैदूला साफ केला होता.) त्यामुळे त्यानी ऑरीओ मायसीन या उत्कृष्ट औषधाच्या मलमाच्या डब्या तयार करून त्यावर जादूटोण्याच्या खुणा रगवून घेतल्या, आणि संस्थेकरता थोडा फायदा राखून या डब्या चेटूकवाल्या वैदूना 'जालीम जादू'चे औषध म्हणून विकल्या. आता काही अडचण येत नाही' विल्सन सांगतात. 'मुले आधळी होत नाहीत, आणि चेटूकवाल्याच्या जादूचा खरोखर परिणाम होतो!'

पण सस्थेच्या बहुतेक अगीकृत कार्यक्रमांना पैशाचे प्रचंड पाठबळ लागते, आणि क्रातिकारक पद्धतीने ते आखावे लागतात. मोतीबिंदूचेच उदाहरण घ्याना. एकटचा भारतात २० लाखाहून अधिक लोक या विकाराने पछाडलेले आहेत. विल्सन म्हणत 'भारतात उत्कृष्ट नेत्र शल्यविशारद आहेत. पण नेहमीच्या रुग्णालयीन पद्धतीने हा प्रश्न सोडवायचा झाल्यास दरवर्षी भर पडणाऱ्या रुग्णानाही पुरेसे उपचार मिळू शकणार नाहीत. त्यामुळे 'मोठ्या प्रमाणावर शस्त्रक्रिया' एवढा एकच मार्ग यातून होता.

१९७० मध्ये विल्सन यानी 'भारतीय नेत्र योजना' (Eyes of India Campaign) हाती घेतली. मदतीला होते भारतातील नेत्रचिकित्सक आणि ब्रिटनमध्ये यासाठी जमा झालेले १९ लाख रुपये. दूरवरच्या कानाकोपऱ्यात 'नेत्रशिबीरे' भरवून तबूत, झोपडीत, देवळात, कुठेही शस्त्रक्रिया करून मोतीबिंदूमुळे अधत्व आलेल्या हजारो ग्रामवासियाना या योजनेमुळे पुन्हा दृष्टिलाभ झाला. स्वत विल्सन याना पुन्हा कधीही दिसू शकणार नाही. पण ते सागतात 'पुन्हा एकदा भोवतालचे जग आणि निकटची माणसे दिसू लागलेल्या माणसाचा आनद अवर्णनीय असतो!'

दोन वर्षात अशा तऱ्हेच्या ६२,००० शस्त्रक्रिया पार पाडून दाखवून विल्सन यांनी आपल्या मोहिमेचे महत्त्व इदिराजीनाही पटवून देण्यात यश मिळविले. अशा तऱ्हेची ५००० शिबिरे दरवर्षी भरवून सुमारे ५ लाख रुग्णाना त्याचा फायदा करून देण्याची विल्सन याची योजना आहे.

अशा प्रकारच्या नेत्र शिबिराची आपल्यापैकी बहुतेकांना कल्पना असेलच. पाश्चात्य नेत्रतज्ज्ञांचा असल्या वातावरणात डोळ्याची शस्त्रक्रिया करायची म्हटले की थरकापच होतो पण या शिबिरात ९५% शस्त्रक्रिया यशस्वी होतात. मोठ्या रुग्णालयात हेच प्रमाण ९७-९८% इतके असते पण मोठ्या रुग्णालयातील १० चे मागे अशा शिबिरात १०० शस्त्रक्रिया होतात.

या योजनेला यश मिळाल्यावर विल्सन यानी लगेच विकसनशील देशातील लहान मुलाची दृष्टी वाचवण्याची योजना हाती घेतली. पूर्वी या देशातील अनेक बालके अन्ना अभावी मरून जात. आता अर्धपोटी राहून ती जगतात. पण त्याच्या आहारात 'अ' जीवनसत्त्व कमी पडल्यामुळे त्याच्या बुबुळावर सार घरते (xeropthalmia) व ती आंधळी होतात. मलेशिया, इडोनिशिया, द. अमेरिका, भारत इ. ठिकाणी अशी सहस्रावधी मुले दृष्टीहीन झालेली आहेत. अजूनही होत आहेत. विल्सन यानी जगातील सर्व अधसस्थाचेवतीने युनिसेफला इशारा दिला. 'अशा परिस्थितीत जर एखादी नैसर्गिक वा कृत्रिम आपत्ती आली तर केवढा हाहा.कार माजेल!' विल्सन याच्या दूर दृष्टीचे प्रत्यतर लगोलग बागला देशात आले. वादळ, पूर आणि युद्ध याच्या दणक्यात या देशातली एक लाख बालके अंध झाली.

लगोलग विमानाने बगला देशला प्रयाण करून विल्सन यांनी शेख मुजिबूर रहमान याची गाठ घेतली; आणि 'अ' जीवनसत्त्वाच्या गोळ्या वाटण्याची त्याची योजना मान्य झाली. युनिसेफतर्फे प्रथम दीडकोटी आणि नतर तीन कोटी गोळ्या वाटण्यात आल्या. २० पैशाला तीन गोळ्या एवढ्या अल्प किंमतीत बागला देशातल्या प्रत्येक गरजू बालकाच्या डोळ्याना सरक्षण पुरवण्यात आले.

पण हा नतरचा उपाय झाला. विल्सन नेहमी प्रतिबधावर भर देतात. त्यामुळे दृष्टीदोष निर्माण होऊ नये म्हणून आपल्या बालकाना कशा प्रआरचा आहार द्यावा हे हे माताना शिकविण्याची योजना त्यानी तयार केली आहे. एका आतरराष्ट्रीय महिला मडळाने या कामाकरिता निधीही गोळा केला आहे आणि दक्षिण भारतात या योजनेच्या प्राथमिक चाचणीला सुरुवातही झाली आहे.

'काम प्रचड आहे. पण केले हे पाहिजेच.' विल्सन म्हणतात. 'मानवी मूल्यामध्ये अधत्वाची जबरदस्त किंमत द्यावी लागते. उद्याच्या बालकाची दृष्टी सुरक्षित राखण्याची सधी आपल्याला प्राप्त झाली आहे. आपणाला ती चुकवणे परवडणारच नाही!'

—आलतू फालतू गोष्टीकरीता वाद माजवीत बसणारे आपण दृष्टी असून आधळे आहोत, आणि विकसनशील देशातील पुढच्या पिढीची दृष्टी शाबूत राहावी म्हणून धडपडणारे विल्सन आधळे असून दूरदृष्टीचे आहेत!

□ □


# श्रीग्रामायन

प्रसिद्ध झाले
मूल्य पंधरा रुपये

लेखक
श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

मध्यंतर

# एक होता शिंपी

## अमल थिएटर्सचे नवे नाटक

पुष्पा भावे

'एक होता शिंपी' या रमेश पवारांच्या नव्या नाटकाचा प्रयोग पाहाण्यापूर्वी वर्तमानपत्रातील जाहिरात पाहिली. उगीचच सनसनाटी जाहिराती करणे, मुद्दाम प्रेक्षकाच्या चुकीच्या अपेक्षा निर्माण करणे हे एखाद्या व्यावसायिक निर्मात्याने केले तर आपण समजू शकतो. (म्हणजे ते समर्थनीय असते असे नाही) परतु दिलीप जगतापाचे नाटक रगमचावर आणणाऱ्या 'अमल थिएटर्स' या सस्थेकडून हे अपेक्षित नव्हते. असो.

'एक होता शिंपी' या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन रमेश पवार यानी केले आहे. 'गुरू' या नाटकाच्या या कर्त्याने पूर्वी 'हगर स्ट्राइक' नावाची एक एकांकिका लिहिली होती. त्यातील उपरोध आणि उपहास यांची साक्ष देऊन पवाराना कॉमेडीचे विशेष अग आहे अशी एक बातमी-वातावरणात होती. 'एक होता शिंपी' या नाटकातील प्रमुख भूमिका अशोक सराफ करणार असे वृत्त ऐकल्यावर त्या प्रयोगातील स्वारस्य विशेष वाढले होते.

तिसरी घटा झाली. पडदा दूर होण्यापूर्वी, एक लहान मुलाचा हट्टी आवाज आणि दुसरा प्रौढ आवाज याच्या मजेशीर सवादातून नाटकाची श्रेयनामावली सादर झाली. पीटर सेलर्सच्या चित्रपटाच्या प्रारभी येणाऱ्या 'फार्सिकल टायटल्स'चे सुखद स्मरण झाले. पडदा बाजूला झाला आणि मराठी रगभूमीवरील पुराणपुरुष–घरकामाचा गडी सामोरा आला हरी (अशोक तावडे) नावाचा तो गडी पूर्वकथन करू लागला, कृत्रिम हातवारे, चलाख वाक्ये याच्या साहाय्याने. फार्सिकल नाटकाचा प्रारभ म्हणून अगदीच मिळमिळीत असणाऱ्या या सवादात प्रचलिताचे सदर्भ खूप होते. पण ते दादा कोडक्याच्या तमाशात अधिक शोभणारे होते. तमाशा 'फार्सिकल' असू शकतो; पण फार्सिकल नाटक तमाशा नसते, हे नाटककार अनेक ठिकाणी विसरला आहे. पण थोड्याच वेळात डॉ. प्रेमळवार (अशोक सराफ) यांनी रगमचावर प्रवेश केला आणि नाटकाला विलक्षण वेग मिळाला. कोणत्याही फार्सिकल नाटकाप्रमाणे 'एक होता शिंपी' हे संशयकल्लोळावर–स्त्रीपुरुषसबधातील सशयकल्लोळावर–उभे राहाते. तीन बायका आणि तीन पुरुष यांच्या नात्यातील चित्रविचित्र घटनातून फार्स पुढे जातो. विचित्र गडगडाटासारखे हसणारा दाबके (विजय शिर्के). बावळट दिसणारा पण बेरकी असणारा डोईफोडे (जनार्दन परब) आणि सासू–बायको यांच्या कचाट्यातून सुटून प्रियाराधन करू पाहणारा डॉक्टर प्रेमळवार या तीन व्यगव्यक्तित्वाच्या आधारे या फार्समधला विनोद निर्माण होतो.

दिग्दर्शक रमेश पवार यानी फार्सचा तर्क जाणूनच अत्यत लवचिक अशा हालचाली बसविण्याचा यत्न केला आहे. परतु अशोक सराफ आणि विजय शिर्के यांचा अपवाद वजा करता एकाही नटाला फार्समधील परस्पर प्रतिक्रियाचे आणि शरिराच्या लवचिक हालचालीचे मर्म कळले नव्हते. स्त्रीकलावतानी तर कृत्रिम (पण व्यग नव्हे) अभिनयाची कमाल केली. अशोक सराफ त्या फार्समध्ये चैतन्य ठेवण्यासाठी प्रत्येकक्षणी धडपडत होते. या नटाच्या कुवतीच्या तुलनेने त्याला योग्य अशा भूमिका अजून मिळालेल्या नाहीत असे वाटते. काही क्षणच रगभूमीवर आलेल्या मगेश कुलकर्णींनी छोट्या मुलाचा आवाज आणि फार्सचे अतिशयोक्त तर्क हे नेमकेपणाने प्रेक्षकांपर्यंत पोचवले. या फार्समधील असह्य प्रकार म्हणजे आता जुनाट झालेला, खाष्ट सासू आणि जावई याचा सघर्ष. विशेषत. जावई–सासू यामधील कुस्ती ही हास्योत्पादक नसून हास्यास्पद झाली आहे.

स्वत: दिग्दर्शन करताना, विशेषत: फार्सला अनुकूल अशा हालचाली बसवीत असताना, सहिता सपादित करण्याची गरज नाटककाराला जाणवणे आवश्यक होते. विनोदाच्या सदर्भात विस्ताराविषयीचा काटेकोरपणा अत्यत मोलाचा असतो. याउलट 'एक होता शिंपी' विनाकारण लाबते. विशेषत: नाटकाच्या अती शिंप्याची गोष्ट पुरी करणे तर सपूर्ण नाट्यरचनेशी विसगतच होते. चमकदार वाक्यापेक्षाही फार्समध्ये नाट्याची बदिस्त रचना अधिक अर्थपूर्ण होते हे भान नाटककाराने राखले असते तर 'एक होता शिंपी' रगतदार झाले असते. परतु दिखाऊ–बटबटीत सामाजिक आशय हा आजवर तरी रमेश पवाराचा दोष विशेष आहे.

'एक होता शिंपी' पहात असताना अशोक सराफाना कोणत्या चागल्या फार्समध्ये स्थान मिळू शकेल असा प्रश्न राहून राहून सारखा मनात येत होता. ◻

# हौशी रंगमंच संघटनेची सर्वसाधारण सभा

गेल्या दोन वर्षात मराठी नाटकाशी सपर्क असणाऱ्या अनेकानी सेन्सॉरशिपविरुद्ध व्यक्तिश वा सामूहिक निषेध नोदवला असला तरी 'सेन्सॉरशिप हटाव' या मताला निश्चित चळवळीचे स्वरूप आले नव्हते. विशिष्ट कृतीवर आलेल्या बदीविरुद्ध निषेध व्यक्त केला की तो अपरिहार्यपणे तपशीलात अडकतो, हे लक्षात घेऊन 'हौशी रगमच सघटने'तर्फे, सेन्सॉरशिपच्या सदर्भात संघटनेची भूमिका निश्चित करण्यासाठी, रविवार दि. १ सप्टेंबर ७४ रोजी एक सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली. ('हौशी रगमच सघटने'ला उदारपणे कार्यालय देणाऱ्या 'मुंबई मराठी साहित्य सघाने', 'या सभेसाठी दुसरी जागा पाहा' असे हलकेच सुचवले. 'मुंबई मराठी साहित्य सघ' ही मराठी नाट्यपरिषदेला सलग्न असणारी सस्था आहे. आणि या नाट्यपरिषदेने सेन्सॉरशिपविरोधी ठराव केलेला आहे!)

या सभेपुढे दोन प्रकारचे निर्णय घेण्याचे काम होते. कलावताच्या आविष्कारस्वातत्र्यावर येणाऱ्या बधनाविषयी भूमिका निश्चित करणे आणि त्या भूमिकेशी सुसगत अशी कार्यवाही निश्चित करणे. ' ही सभा कोणत्याही स्वरुपाची सेन्सॉरशिप मान्य करीत नाही. ' हा ठराव एकमताने पास झाला. त्यानंतरच्या चर्चेत ही चळवळ कशी उभारावी हे ठरून, त्या चळवळीचे टप्पेही निश्चित करण्यात आले. सघटनेचा लोकशाहीवर विश्वास असल्यामुळे त्या व्यवस्थेने उपलब्ध करून दिलेले सर्व मार्ग प्रथम चोखाळावे असे ठरले.

१. रगभूमी प्रयोगपरिनिरीक्षण मडळातील कलावत सभासदाना त्यागपत्र देण्याचे आवाहन करणे.

२. चळवळीला निर्णायक यश मिळेपर्यंत मंडळाला नाटचसहिता सादर करताना निषेधपत्रासह सादर करणे.

३. शासनाच्या सबधित अधिकाऱ्याना भेटून त्याना कलावताची बाजू समजावून सागणे.

४. सर्वसाधारण जनतेला कलावताची रास्त बाजू समजावून सागण्यासाठी गावोगाव व्याख्याने, चर्चा, परिसवाद आयोजित करणे.

५. विविध क्षेत्रातील विचारवतांच्या, कलावतांच्या, रसिकांच्या सुमारे ५ हजार सह्या एका जाहीर निवेदनावर घेऊन ते निवेदन ' महाराष्ट्र राज्य सास्कृतिक सचालनालया 'ला सादर करणे.

या सर्व उपायाना सभेने एक वर्षाची कमाल मर्यादा दिली आहे. जर सनदशीर मार्गाने सेन्सॉरशिप रद्द झाली नाही तर सर्व हौशी सस्था ' रगभूमी प्रयोगपरिनिरीक्षण मडळा 'ला सहिता सादर करणे बद करतील. प्रत्येक सस्थेला सभासदासाठी प्रयोग करणे शक्य नाही. किबहुना अशा प्रयोगाने मूळ प्रश्न सुटत नाही. त्यामुळे या अवस्थेला सर्व कलावत सत्याग्रह म्हणून ' फूटपाथ रगभूमी ' उभारतील; स्वत.ला अटक करून घेतील. ' सांस्कृतिक सचालनालयाच्या सर्व कार्यक्रमांवर बहिष्कार टाकतील. जोपर्यंत ' सेन्सॉरशिप ' ही कल्पना हद्दपार होत नाही तोपर्यंत हा सत्याग्रही मार्ग चालू राहील.

ही कार्यवाही ' हौशी रगमच सघटने 'ने निश्चित केलेली असली तरी ज्या कोणा सस्थेचा वा व्यक्तीचा कलावंताच्या आविष्कार स्वातंत्र्यावर विश्वास असेल तिने या चळवळीत सामील व्हावे. आज ' सारे प्रवासी तिमिराचे ' सारख्या व्यावसायिक नाटचप्रयोगातील ' नक्षलवाद ' शब्दाला वा ' पोलीस लाच घेतात ' सारख्या उल्लेखांना हरकत घेतली जाते. तरीही आविष्कारस्वातत्र्यासाठी लढा देणे हा हौशी वा प्रायोगिक सस्थाचा प्रश्न आहे असे का मानले जाते ?

' हौशी रगमच सघटने 'च्या या सभेत घेतलेले निर्णय महाराष्ट्रातल्या सर्व रंगभूमी-कलावताना व अन्य विचारवतांना, रसिकाना कळावे म्हणून सभेचा हा वृत्तात ' माणूस '-मध्ये देत आहे. (या सभेला मी व्यक्तिश. उपस्थित होते, त्यामुळे या वृत्तांताची जबाबदारी माझी राहील.) वरील चळवळीच्या सदर्भात कोणाही सस्थेला वा व्यक्तीला अधिक माहिती हवी असल्यास, त्यानी ' हौशी रगमच सघटने 'शी (द्वारा ' मुबई मराठी साहित्य सघ ') सपर्क साधावा, ◻

## पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या निमित्ताने–

वि. भा. देशपांडे

प्रतिवर्षाप्रमाणे महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित ' पुरुषोत्तम करडक स्पर्धा ' २४ ते ३० ऑगस्ट या सप्ताहात झाली. या वर्षी एकूण २१ सघानी भाग घेतला. प्रत्येक एकांकिका-प्रयोगाचे समीक्षण करण्याचा माझा मनोदय नाही. तर या स्पर्धेच्या निमित्ताने काही प्रश्नाचा ऊहापोह करावासा वाटतो.

सख्येच्या दृष्टीने विचार केला तर कलाकाराच्या सघाचा प्रतिसाद दर वर्षी वाढतच आहे. पण स्पर्धेचा सख्यात्मक विस्तार होत असताना गुणवत्तेच्या दृष्टीने विस्तार झाला की नाही, हे पाहाणे अगत्याचे आहे. या वर्षीच्या एकूण प्रयोगांच्या गुणवत्तेची इयत्ता मध्यम प्रतीची होती. प्रथम दर्जाची गुणवत्ता लाभलेला किंवा कोणत्याही कारणाने तो प्रयोग पुन्हा पहावा असा एकही प्रयोग त्या योग्यतेचा वाटला नाही. मध्यम आणि कनिष्ठ स्तरावरच सारे प्रयोग होते. स्वाभाविकच स्पर्धा सुरू झाल्यानतर दुसऱ्या दिवशीच्या प्रयोगाची उत्कठा वाढायला हवी होती, तसे घडले नाही.

या वर्षी स्पर्धा फर्ग्युसनच्या ऐवजी बृ. म. वाणिज्य महाविद्यालयाच्या सभागृहात झाली. शब्द ऐकू येण्याच्या दृष्टीने अनेकदा विघ्ने आली. पण त्यापेक्षाही या वर्षीच्या विद्यार्थी-प्रेक्षकामुळे स्पर्धा पाहाण्यात फार मोठे विघ्न आले. आपल्या स्वत च्या कॉलेजचा प्रयोग असताना शातता ठेवणे, आणि अन्य कोणाच्या प्रयोगाला उधळून लावणे ही विघातक वृत्ती मोठ्या प्रमाणात दिसून आली. त्या वृत्तीने अनेक सघाना निराशा पदरी घ्यावी लागली. हा प्रेक्षक अवाच्य शब्द वापरून अकारण आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत होता, पुढच्या काही रागावर निमत्रित प्रेक्षक आणि परीक्षक यांना प्रयोग पाहाणे असह्य करून सोडीत होता. विद्यार्थी-प्रेक्षकानी हीच वृत्ती कायम ठेवली तर स्पर्धा सुरक्षितपणे होणे अवघड होणार आहे त्याचा विचार अत्यत गभीरपणाने विद्यार्थी–प्राध्यापक –सस्थेचे कार्यकर्ते इत्यादीनी केला पाहिजे. स्पर्धेचे गांभीर्य विद्यार्थ्यांना समजणार नसेल तर त्यांच्यासाठी आणि त्यांचीच असलेली ही स्पर्धा पुढे चालू ठेवायची की नाही याचाही पुनर्विचार करावा लागेल !

गेल्या दोन-तीन वर्षांपासून या स्पर्धेत एक लक्षवेधी गोष्ट घडत आहे, ती म्हणजे अनेक महाविद्यालयाच्या प्रयोग-निर्मितीमध्ये फार महत्त्वाचा वाटा पुण्यातील हौशी नाटच सस्थेतील लोक उचलीत आहेत. पी. डी. ए., कलोपासक, थिएटर ॲकॅडमी इत्यादी सस्थेतील लोक प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष या स्पर्धेत उतरले आहेत. त्यानी कोणत्याही प्रयोगास मित्रत्वाच्या नात्याने मदत जरूर करावी, सल्ला द्यावा, सहकार्य द्यावे, पण त्या सहकार्याच्या मर्यादा जाणाव्यात. मदत किंवा सहकार्य म्हणजे सपूर्ण प्रयोग उभारून देणे

नव्हे. तसे घडू लागले तर प्रत्येक महाविद्यालय या संस्थेतील लोकाना स्पर्धेसाठी पाचारण करील. शेवटी स्पर्धा महाविद्यालयांची न राहता या हौशी संस्थाची होईल. मला वाटते, ही चिंतनीय बाब आहे. या संस्थांना आपले कलागुण दाखवण्यासाठी राज्य स्पर्धा आहेत. ते क्षेत्र फार मोठे आहे. त्यानी या महाविद्यालयीन स्पर्धेत भाग घेऊन हे क्षेत्र झाकोळून टाकू नये. महाविद्यालयीन प्रयोगाचे जे आणि जसे स्वरूप आहे ते अधिक शुद्ध राहू द्यावे, शबलित करू नये.

परीक्षकांच्या संदर्भात दर वर्षी चर्चा चालू असते. प्रत्येक वर्षी असणाऱ्या परीक्षकाच्या नावाबाबत उलट सुलट चर्चा होत असते. परीक्षक मिळवण्याबाबत संस्थेच्याही काही अडचणी असतात. त्यासंबंधी असे सुचवावेसे वाटते की, तीन परीक्षकामध्ये (१) महाविद्यालयाशी संबंधित असलेली आणि नाटय किंवा कलाविषयक जाण असलेली व्यक्ती असावी. (२) दुसरी व्यक्ती नाटक–रंगभूमीशी प्रत्यक्ष संबंध असलेली असावी. (३) तिसरी व्क्ती रेडिओ, टी. व्ही. किंवा साहित्य प्रांतातील असावी. अशा प्रकारचे समीक्षक लाभणे सहज सोपे आहे असे नव्हे याची मला कल्पना आहे. पण पुढल्या वर्षी स्पर्धेच्या अगोदर विद्यार्थी–प्रतिनिधीच्या ज्या सभा होतील त्यामध्ये परीक्षकाच्या नेमणुकीच्या स्वरुपाची, नावाची चर्चा संयोजकांनी करावी. उभयताच्या चर्चेतून काही नेमका मार्ग निघू शकेल.

या काही प्रश्नांची थोडीफार चर्चा करण्याचे प्रयोजन एवढ्याच करिता की ही स्पर्धा पुण्यातील महाविद्यालयाच्या नाट्यविषयक कार्यामध्ये महत्त्वाचे स्थान मिळवून बसलेली आहे. याच स्पर्धेतून उद्याच्या रंगभूमीवरचे अनेक कलाकार निर्माण होणार आहेत. आजवरच्या स्पर्धेतून आलेली जब्बार पटेल, माधव वझे, सतीश आळेकर, मोहन गोखले, मोहन आगाशे, मधू जोशी, आनंद लागू अशी कितीतरी नावे सांगता येतील. मला वाटते, अशा अनेक कलाकाराची संख्या वाढत जाणे हेच या स्पर्धेचे फलित आहे. हे जर मान्य असेल तर स्पर्धेच्या संदर्भात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नाचा पुनर्विचार होणे महत्त्वाचे आहे. □ □

## साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

१४–९–७४ ते २०–९–७४

### आयात परवाने प्रकरण उग्र बनेल

पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या खास प्रेरणेने आयात परवाने प्रकरणात जरी संसदीय समिती नाकारली गेली तरी या आठवड्यात ते मिटणार नाही. उलट जनतेच्या वेशीवर व त्यात अडकलेल्या खासदार मंत्र्याच्या बाबतीत प्रचंड असंतोष निर्माण होईल. मिश्रांना वाचवणे प्रधानमंत्र्याना अशक्य होईल. महाराष्ट्रात मंत्रिमंडळात तात्पुरते बदल होऊ पहातील. गफूरच्या बाबतीतदेखील इंदिरा गांधी निर्णयाप्रत येतील. भ्रष्टाचाराचे आणखी एखादे उच्चस्तरीय प्रकरण उघडकीस येईल. भारत-पाक बोलणी सरळपणे होऊ शकणार नाहीत.

### मेष : विवाहाचा योग

आज पंचमस्थानी रवि-चंद्र आहे. पण महत्त्व फक्त रवीला आहे. तो स्वगृही व पुन्हा पाचवा, फार छान आहे हा आठवडा. मंगळाचे शत्रुस्थानी भ्रमण म्हणजे विरोधकाना जबरदस्त वचकच होय. दि. १४ च्या बुध-हर्शलच्या तूळ राशीतील युतीपासूनच तुमचे कर्तृत्व व सामर्थ्य चमकायला लागेल. अनेक क्षेत्रात तरवारीच्या पात्याप्रमाणे बुद्धी चालवाल. तुम्ही अविविहीत असाल तर प्रेमविवाह जमून जाईल. नोकरी, व्यापार कारखाना यात तुम्हाला मोठी पदे मिळतील. महिलानी संयमाने वागून नोकरीत लाभ घ्यावा.

### वृषभ : सुख येई दारी

आजची तूळ राशीतील बुध-हर्शलाची युती तशी तुम्हाला वाईटही नाही व अनुकूलही नाही. पण एकटा पाचवा मंगळ तुम्हाला हवे ते देणार आहे. तो तुमची शान वाढवणार आहे. समाजकार्य, राजकारण किंवा निवडणुकीसारख्या स्पर्धा यात तुमच्या यशाला तोड राहणार नाही. राज्य अथवा केंद्र सरकारच्या उच्चपदाच्या परीक्षात तुम्हाला घवघवीत यश मिळेल. नोकरीतील आजवरचा त्रास कमी होईल. बदली बढतीचेही जमावे. तूर्त प्रस्थापित उद्योगातच लक्ष घाला नवे पाऊल तूर्त नको. तब्येतीची काळजी घ्या. पैसा कमी पडणार नाही. महिलानी कलाक्षेत्रात धाडसाने पाऊल टाकावे.

### मिथुन : राजकीय सन्मान

मंगळ चौथा आल्यापासूनच तुमची मनःस्थिती दोलायमान झालेली आहे. कोणत्याच निर्णयावर मन स्थिर होत नाही. पण या वेळी तापटपणाच्या आणि संतापाच्या आहारी जाऊन उपयोगी नाही. डोके शांत ठेवून येणारे आक्षेप व मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना धैर्याने सहन केल्या पाहिजेत. राहात्या जागेत घरमालकाशी तेढ निर्माण होईल. विकत घेतलेल्या वा विकायच्या स्थावर जमिनीसंबधात एखादे लफडे पाठीशी लागण्याची शक्यता दृष्टिआड करू नका. नोकरीत मात्र कामाचे चीज होईल. पंचमस्थानी दि. १४ ला होत असलेली बुध-हर्शलची युती राजकीय महत्त्व वाढवील. महिलांनी शेजाऱ्याबरोबरची भांडणे टाळावीत.

### कर्क : आळस झटका

आठवड्याचे पहिले दोन दिवस चंद्र फारसा अनुकूल नाही. पण त्यानंतर मात्र तुमच्या मागची प्रतिकूल परिस्थिती, निवळत जाईल. तिसरा मंगळ तर हवे ते मनोरथ पूर्ण करीलच पण कला, व्यापार, उद्योग यात नवी क्षेत्रे उपलब्ध करून देईल. आशा-आकांक्षा व कर्तृत्व चमकून जाईल. नोकरीत साहेबाची साडेसाती आता बाधणार नाही. त्याच्याकडूनच तुमच्याबद्दल स्तुती सुरू होईल. दिनांक १४ ला तूळ राशीत होणाऱ्या बुध-हर्शल युतीपासून राहात्या जागेची वणवण

कमी होईल. एखादी मनासारखी जागा मिळून जाईल. पैशाचा अपव्यय मात्र टाळा. महिलांची बगल्याची इच्छा पुरी होईल.

### सिंह : सन्मित्राची मदत

याच आठवड्यात राशिस्वामी रवी बदलणार आहे. दुसरा होईल. दुसरा मगळ व रवी याच्याबद्दल फारशी आशा करण्यात अर्थ नाही. व त्यांच्याकडून कोणताही लाभ होणार नाही. झालाच तर थोडाफार त्रासच होईल. आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होईल. पैसा पुरा म्हणून पडणार नाही. दुसरा थोडा त्रास म्हणजे कौटुबिक त्रास. आजार, झोपमोड, कटकट वगैरे प्रकारच्या त्रासाने हैराण व्हाल. असे असले तरी बुध-हर्शलाची युती तुमचे जीवन सुसह्य करील. धनिक व प्रेमळ अशा चागल्या मित्राकडून सहानुभूती व सहाय्य मिळेल. नोकरीत चीज. महिलांनी परिस्थितीशी जमवून घ्यावे. पैसा पैसा करू नये.

### कन्या : सुस्थितीची पहाट

पहिले एक दोन दिवस खाण्यावर बधन ठेवा. गरजेपेक्षा खाऊ नका. उगीच अपचनाचा, पोटदुखीचा त्रास ओढवून घेऊ नका. मात्र सोमवारनतर परिस्थितीला अनुकूल कलाटणी मिळेल. अडचणी व त्रास कमी झालेला दिसू लागेल. तुम्हाला बाराव्या मगळाने फारच छळले. तुमची मानसिक शक्ती क्षीण केली तर शारिरीक ताकद खच्ची केली. पण हाच मगळ आता पहिला झाला आहे तो तुमच्या बाबतीत अनेक अनुकूल बदल घडवून आणील. नोकरी-धद्यातील बस्तान व्यवस्थित बसेल. आर्थिक ताण थोडाफार सुसह्य बनवील. महिलानी निराशा सोडावी. मनासारखे होऊ लागेल.

### तूळ : मंगळाची अवकृपा

पाचव्या गुरूची तुम्हाला उत्तम साथ असल्यामुळे कितीही सकटे आली तरी त्यातून गुरूमहाराज तुमची सहीसलामत सुटका करतीलच ते तुमची प्रतिष्ठा कमी होऊ देणार नाहीत. तुमच्या स्थैर्याला धक्का लागू देणार नाहीत. मात्र एवढी जमेची बाजू सोडली तर बाराव्या मगळाची दखल तुम्हाला घ्यावीच लागेल. त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तुम्ही नोकरीत महत्त्वाच्या जागी असाल, तुमच्या हाती पैसा हाताळण्याचे काम असेल तर तुम्ही पैशाचे काम बदलून घेणे उत्तम. यावेळी कुणालाही जामीन राहू नका. महिलानी सावधगिरीने वागावे. नोकरीत प्रगती.

### वृश्चिक : आर्थिक उन्नती

सप्ताहाच्या सुरुवातीलाच चद्र अनुकूल नाही आणि बुध-हर्शलाची व्ययस्थानी युती होत आहे. त्यामुळे नोकरी असो वा कोण-ताही स्वतत्र धदा असो अत्यत विचारपूर्वक वागायला हवे. लेखी व्यवहार करताना चांगल्या माणसाचे सहकार्य-मार्गदर्शन घ्या. स्वतःच्या मनाने वाटेल ते करू नका. एवढे सोडले तर आर्थिक बाबतीत हा सप्ताह बराच उन्नतीचा जाईल. लॉटरीची 'सरकार-मान्य' तिकिटे अवश्य घ्या. नशीब बहरून येईल. रेस शौकिनाना हा आठवडा घबाड मिळवून देईल. व्यापारात झालेला सर्व तोटा भरून येईल. तर नोकरीत जुन्या पगाराची भरपाई होईल. महिलाना दागिन्याची हौस पुरी करता येईल.

### धनू : नोकरीत बढती

तिसरा गुरू तुम्हाला अनेक बाबतीत सहाय्य देऊन सांभाळून घेतच आहे. बाराव्या राहूने तब्येत व मन याच्या स्वास्थ्याला लावलेले ग्रहणदेखील हा गुरू तुमच्या बाबतीत सुसह्य करीत आहे. आता रवी-मगळ दहावे, गुरू तिसरा, तुमच्यावर अद्वितीय अशी कृपा करीत आहेत. गेल्या कित्येक वर्षांत इतकी समर्थ ग्रहाची कृपा धनू व्यक्तीच्या बाबतीत झाली नव्हती. अशी परिस्थिती हातून ऐतिहासिक कार्य घडवीत असते. मोठमोठे लाभ सहज पदरी पडतात. राजकारणात नेतृत्व प्राप्त होते, वाङ्मयात नेत्रदीपक यश मिळते व उद्योगात धनाची समृद्धी होते. नोकरी करणाऱ्या महिलाना प्रमोशनचा योग.

### मकर : इच्छापूर्ती होईल

राशी स्वामी शनी जरी सहावा असला तरी विधायक कार्याच्या दृष्टीने तुम्हाला त्याचा फारसा उपयोग होत नाही. दुसरा गुरू तुमची आर्थिक बाजू पडू देणार नाही. चार पैसे हाती कुठून ना कुठून येतील. गरज भागवतील. नव्या योजनाना मात्र तूर्तचा काळ एवढासा अनुकूल नाही. तरीपण भाग्य-स्थानी आलेले रवी-मगळासारखे सामर्थ्यवान ग्रह अनेक क्षेत्रात तुमची इच्छापूर्ती घडवून आणणार आहेत. नोकरी असो राजकारण असो, जनसेवा असो की कारखाना असो त्या त्या क्षेत्रात तुमच्या हातून अलौकिक असा पराक्रम घडवणार आहे. नोकरीत प्रमोशनवर बदली. महिलाना आपल्या उद्योगधद्यात प्रगती करता येईल.

### कुंभ : शरीर व मन अस्वस्थ

एकटा राशीत असलेला गुरू तुमचे सारे मनोगत सुसगत ठेवील व तुमचा तोल जाऊ देणार नाही. तुमची प्रतिष्ठा उचावली नाही तरी तिती अप्रतिष्ठा होऊ देणार नाही. नोकरीत वरिष्ठाची मर्जी नसली तरी अव-कृपादेखील असणार नाही. धद्यात व व्यापार उदीमात नफा नसला तरी नुकसान होणार नाही. पण आठवे रवी-मगळ मात्र आपली उग्रता, प्रतिकूलता याचवेळी दाखवू लागणार आहेत. अनेक प्रकारचे खर्च अचानक उदभव-तील. एखादा साधा आजारदेखील शरीर स्वास्थ्य नष्ट करायला कारण होईल व मनस्थिती विचित्र बनेल. महिलांनी सशयाने वागू नये व ससारात लक्ष द्यावे.

### मीन : कौटुबिक स्थित्यंतर

या आठवड्यात तुम्ही कोणत्याच प्रकारे घाबरून जाऊ नका, पण तुमच्या भोवती निर्माण होणाऱ्या प्रतिकूल परि-स्थितीला कुलदेवतेवर निष्ठा ठेवून सामोरे जा असे ग्रह बजावीत आहेत. सातवे रवी-मगळ व चौथा शनी घरात बसणेही अशक्य करून टाकील. ससारात अनत अडचणी निर्माण होऊ पाहातील. पत्नीचा हट्ट नुकसान करील व डोके फिरते की काय असे वाटावे इतकी स्थिती येईल. भाऊबद मजा पाहातील तर मुले सकटे निर्माण करतील. असे असले तरी पैसे कमी पडणार नाहीत व मित्राचे सहाय्य होईल. महिलानी कुणाच्या भाडणात पडू नये.

□ □

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## रणधीर कपूर

### पडद्यावर हा कधी स्वस्थ बसायचा नाही !

कपूर फॅमिलीतले सारेच पुरुष अदाकार होण्यासाठी जन्माला आलेले असतात. रणधीर कपूर – म्हणजेच ढब्बू. याने कपूर घराण्यात जन्म घेतला ही त्याची चूक असेलही, पण तो आता सगळ्यांचा मगज खाणारा अदाकार बनला आहे. शरिराने मोटा, हिरोला साजेशी सुरत नसलेला, एरवी त्याचे व्यंगचित्र काढले तर चॅप्लिनसारखे मजेशीर वाटेल, पण छायाचित्रात मात्र चिक्कार ढब्बूसारखाच दिसणारा. असा हा कपूर म्हणजे कपूर घराण्यातल्या एकसोएक खुबसुरत हिरोंना बदनाम करतो. राजकपूरचे निळे डोळे, शशीकपूरची झुल्फे, फार काय ऋषीकपूरचे नवेलेपणही त्याच्यामध्ये नाही. त्याच्याकडे आहे ते फक्त असली ' ढब्बू 'पण. म्हणूनच त्याचे नाव घरातल्या मंडळींनी ' ढब्बू ' ठेवले असावे. कपूर घराण्यातला मुलगा जन्मतांच रडतो ती देखील अदाकारी असते असे म्हणतात. अदाकाराच्या पोटी जन्मलेला, अदाकार म्हणून जन्माला आलेला हा ' ढब्बू ' एक दिवस पडद्यावर येणार हे त्याच्या ललाटीच लिहिले होते. पूर्वी म्हणे पृथ्वीराज कपूर एक दिवस चित्रपटाचा वारसा आपला सुपुत्र राजकपूर याच्या हाती सुपूर्द करून बाजूला झाला होता. पृथ्वीराजच्या ह्या सुपुत्राची कारकीर्द पित्याचे नाव रोशन करणारी झाली, हे सांगायला नकोच. त्यानंतर एक दिवस पिता राजकपूर याने आपला वारसा लडका रणधीर याच्या हातात सुपूर्द केला. पण आता जमाना असा विचित्र होता की रणधीरचा ' आज-कल और कल ' हा चित्रपट रिलीज झाला नाही तोच जो तो म्हणाला, ' छे: हा पोरगा म्हणजे काही राज नाही. अभिनय तर अगदी नवख्यासारखा करतो. ' अर्थातच सारी मंडळी चुकली होती. ' कल-आज और कल 'मध्ये ढब्बूने ज्या प्रकारचे काम केले तसेच त्याने आजच्या ' हाथ की सफाई 'मध्ये केले आहे. त्याची मान हलवण्याची, गर्दन पुढे झुकवण्याची रीत. बातोबातोमें हात पसरण्याची रीत, सलाम करणे, किंवा ' टाळी मागणे ' अशी काहीतरी पेश केलेली एखादी लकब, आणि सर्वात म्हणजे त्याची ' जादा आत्मविश्वासाने चाललेली गडबड, बडबड ' ही त्याच्या अदाकारीची वैशिष्टये ' कल-आज और कल 'मध्येही दिसत होती. आपल्याला ढब्बू तेव्हाच आवडला. हंफ्रे बोगार्टविषयी असे म्हणतात की ' त्याला कोठचीही भूमिका द्या. तो ती हंफ्रे बोगार्टच्या ढांच्यात बसवूनच पेश करील, पण तरीसुद्धा तुम्हाला तो आवडल्यावाचून रहाणार नाही. ' ' ढब्बू 'चे तसेच आहे. त्याचे काम पडद्यावर जबरदस्त अदाकारी करण्याचे नाही. ते काम संजीवकुमार किंवा अमिताभ यांना सांगा. त्याचे काम पडद्यावर सतत हलचल मचवण्याचे आहे.

' रिक्षावाला ' या चित्रपटामधला एक प्रसंग. ढब्बू प्राणकडे इन्साफ मागण्यासाठी आलेला

असतो. तेव्हा प्राणचे आणि व्हिलन अन्वर हुसेनचे संबंध आहेत हे त्याच्या लक्षात येते. तो त्यावेळी, डायलॉग टाकतो, ' तुमच्यासारख्या माणसाचे या घाणेरड्या माणसाशी संबंध ! ' तो डायलॉग ऐकता ऐकता वाटते की ढब्बूने आपला हात पड्यावरून आपल्या सीटपर्यंत पुढे सरकवलाय नी ' आपण प्राणला कसा घेतला ' म्हणून त्याने आपल्याकडे ' दे टाली ' म्हणून हात पसरलाय ! तो प्रत्येक चित्रपटामध्ये हेच करीत आलाय. हिंदी चित्रपट हे हिंदी चित्रपटच असल्यामुळे ढब्बूने ' अदाकारी 'ची जी स्टाईल उचलली आहे ती त्याला साजली आहे. अगदी महंमुदला किंवा देव अनंदला त्यांची स्टाईल साजली आहे त्याप्रमाणे. मजा अशी की देव आनंद, महंमुद आणि ढब्बू हे हिंदी चित्रपटात एकच एक भूमिका निभावतात – पडदा जिवंत ठेवण्यासाठी कधी कधी त्यांचा हा खटाटोप यशस्वी होतो – कधी कधी अयशस्वी. त्यांना एकामागून अपयश येऊ लागले की देव आनंद म्हातारा झाला, महंमुदचे विनोद वाह्यात असतात किंवा ढब्बू ' कुछ कामका नही ' अशी भाषा ऐकू येऊ लागते. मग एक दिवस ' अमीर-गरीब ' येतो. आणि देव आनंद अद्याप जवान असल्याचा पब्लिकला भास होतो. महंमुदचा ' पॉकेट मार ' येतो आणि ' महंमुद चांगला विनोदी नट आहे पण–' वगैरे भाषा चालू होते आणि ' हाथकी सफाई 'च्या यशावरोबर ढब्बूच्या ' जवानी-दिवानी ' आणि ' रामपूरका लक्ष्मण ' याचीही लोकांना आठवण होऊ लागली आहे. एकूण ही तीन मंडळी हिंदी चित्रपट हा ' हिंदी ' चित्रपट आहे तोपर्यंत त्याला झपाटायचं सोडणार नाहीत.

कपूर घराण्याचे एक वैशिष्टच आहे ते म्हणजे जसबानी अदाकारी. ' आवारा ' इमेज असलेला राज, उछलकूद करणारा शम्मी किंवा शशी हे एरवी जबरदस्त जसबानी अदाकारी करतात. ' तीसरी कसम 'मध्ये राजकपूरची ही अदाकारी प्रत्येक फ्रेमवर कोरली आहे. ' आ गले लग जा 'मध्ये शशी शत्रूच्या पाया पडण्याचा प्रसंग असाच शशीच्या अदाकारी विषयी बोलून जातो. ' प्यार–मोहब्बत 'मध्ये शम्मीने साऱ्या पिक्चरभर उछल–कुदगिरी केली, पण एका लहानशा प्रसंगात त्याचा बुजुर्ग अदाकार बलराजबरोबर मुकाबला होतो. ' भाई, आप ये कह रहे है और मुझे ? ' एवढाच डायलॉग. पण बलराज त्याच्यापुढे लहान वाटतो. यांचा वारसा डोक्यावर आहे रणधीरच्या. ' कल, आज और कल 'पासून ' हमराही 'पर्यंत रणधीरने



रणधीर कपूर (हाथ की सफाई मध्ये) –कपूर फॅमिलीतील त्याचे ' ढब्बू 'पण आपल्याला शुरुसे पसंत पडले आहे.

जसबानी प्रसगात कधीच जोर दाखवला नव्हता. पण, ' रिक्षावाला 'मध्ये मात्र माला सिन्हापुढे त्याला उभे रहाण्याचा प्रसग आला होता आणि तो नीट उभा राहला. ' हाथ की सफाई 'मध्ये प्रथमच रणधीरने काही जसबानी अदाकारी केली आहे. सत्येन कप्पू त्याला ' किसीका भरोसा तोडना अच्छा नही ' म्हणतो तेव्हा तो चागला हवकल्यासारखा पिक्चरभर वागतो. (मजा अशी की ' हाथ की सफाई 'मध्ये ढब्बूचा मुकाबला विनोद खन्नाशी होता. पण ' रामपूर का लक्ष्मण 'मध्ये शत्रुघ्न सिन्हासमोर उभा रहाणाऱ्या ढब्बूला विनोदने खाऊनच टाकल !) एकूण, जसबानी अदाकारीमध्ये ' ढब्बू ' हळू हळू सुधारेल असं आता वाटू लागलय. पक्का ' कपूर ' बनेल अशी खात्री वाटू लागली आहे

आणखी एक मुकाबला ढब्बूच्या नशिबी लिहिलेलाच आहे, ऋषी कपूरशी. ' बॉबी ' सुपर हिट झाला आणि छोटा भाई ऋषी बडेभाई ढब्बूच्या पुढे निघून गेला. लोक आता ढब्बू ऋषीला कधी गाठतो हेच पहात रहाणार लोकाच्या नजरेतून ' दो भाई ' मध्ये वेगवेगळ्या प्रकारचे ते अदाकार असले तरी, कॉंपीटिशन असतेच ना !

हा. जोपर्यंत ते वेगवेगळ्या बॅनरखाली काम करत असतील तोपर्यंत लोक त्याना सूट देतील. पण जेव्हा एकाच बॅनरखाली त्याना काम करण्याचा प्रसग येईल तेव्हा—

आर. के. फिल्म्सचे आगामी ढब्बूचे काम असलेले चित्र ' हेन्ना ' येत आहे. जो तो म्हणतोय हे पिक्चर बॉबीसारखे हिट झाले नाही तर ढब्बूलाच पकडायला हवे. बिचारा ढब्बू !

## रिव्यू लिखना छोड दिया !

आय. एस. जोहर का फाईव्ह राईफल्स. (एक नही, दो नही, रायफल्स फाईव्ह) आज मुबईमे रिलीज हो रहा है. जिगर थाम के रखो. इस पिक्चरके बारेमे आपको रिव्यू वगैरा वगैरा कुछ भी पढने नही मिलेगा— क्यू की—

जोहर साहेबानी म्हणे आपल्या प्रसिद्धी प्रमुखाना कळवले आहे माझा हा चित्रपट पत्रकारांना मुळीच दाखवायचा नाही. आणि जर कुणी पत्रकाराने ' फाईव्ह रायफल्स 'वर परीक्षण लिहिले तर त्याच्यावर खटला करण्यात येईल. यावर असे ऐकतो की ' मानो या ना मानो, मैने रिव्ह्यु लिखना छोड दिया '— असे सारे समीक्षक कल्याणजी आनदजी यांच्या तर्जवरच गाऊ लागले आहेत.

## मुंबईकरांचा हाजमा

रेशनवरचा ताबडा गहू आणि बडल तांदूळ भेसळीचे गोडे तेल आणि डालडाच्या ऐवजी मिळणारी चरबी, खाऊन खाऊन मुबईकरांचा हाजमा किती बिघडलाय, हे पहायचे असेल तर ' बढती का नाम दाढी 'च्या ' शो 'ला जाऊन बसावे. या पिक्चरमध्ये सुरुवातीलाच निर्माता–दिग्दर्शक वगैरा वगैरा असलेला किशोरकुमार तुम्हाला इशारा देतो की, ' माझे पिक्चर पहाताना शहाणे असाल तर डोके थिएटरच्या बाहेर ठेवून या आणि तरीही तुम्हाला पिक्चर आवडले नाही तर तुमचा ' हाजमा ' (पोट) बिघडला आहे असे खास समजा. ' मुबईकराना डोके आहे असला आपल्या मनात कधीच गैरसमज नव्हता. (' हाथ की सफाई ' चालला यावरून पहा ना ! ) तेव्हा साऱ्यानाच ' दाढी ' आवडेल असे मला वाटत होते. पण, एकूण लोकाना ' दाढी ' आवडलेला दिसत नाही. त्या अर्थी मुबईकराचे दिवसेदिवस वाईट रेशन खाऊन पोट किती बिघडले आहे, याचा अदाज येतो.

' दाढी ' हे एक मॅड पिक्चर आहे. कारण किशोर हा एक मॅड माणूस आहे. सारेजण तुम्हाला हेच सांगतील. दाढी आवडलेले आणि ' दाढी ' न आवडलेलेही. ' दाढी 'चा प्रेस ' शो ' झाला, त्याच वेळी काही अखबारवाले ' दाढी 'वर खुश झाले नि म्हणाले, ' अफलातून किशोरने कसलीही प्रिटेन्शान्स (बहाणे) ठेवलेली नाहीत, अर्थात हा एक बहाणाच आहे.

एकूण ही मडळी किशोरच्या बहाण्याला फसली होती. किशोर हा ' मॅड ' नाहीच मुळी. आणि ' दाढी ' हे मॅड पिक्चर नाहीच मुळी. ते एक ' पिक्चर–अतर्गत पिक्चर ' आहे. ' दाढी 'चा सूत्रधार असलेला किशोरकुमार आणि निर्माता–दिग्दर्शक किशोरकुमार वेगळे आहेत. आणि सिनेव्यवसायातील नाना फॅशनी आणि तऱ्हा यांची चेष्टा करण्यासाठी या सूत्रधार किशोरकुमारला निर्माण केले आहे व सुसगत पटकथेची मनासारखी मोडतोड करून अखेर सारा प्रकार म्हणजे गंमतच आहे असा बहाणा केला आहे. किशोरची प्रिटेन्शन्स हीच. ही समजली तर माणूस अफलातून आहे हे लक्षात येईल.

कुणीतरी म्हटलय की, जोहरने उभा केलेला पारशी हा पारशी जमातीचा अपमान नाही काय ? कमाल आहे. म्हणजे पारशी लोक आय. एस. जोहरच्या बदुकवाल्यासारखे नसतात तर कसे असतात ? याना पारशी ठाऊक नसावेत ! मला ठाऊक आहेत शिवसेनेचे दादी गोवाडिया. त्यांच्या गोष्टी सागू का...! ■ ■

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजसंस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री ग. माजगावकर** यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

# HIGRADE REFRACTORIES PVT. LTD.

208, New Anant Bhuvan,
257/65 Narsi Natha Street,
BOMBAY - 400 009.

**Mine Owner And Producer of Best Quality Foundry and Glass Grade Silica Sand.**

# HIGRADE STRUCTURALS & ENGINEERS

## KASARDE

Tal. : Kankavali
Dist. : RATNAGIRI.